सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १५३ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. ११ जुलै २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# विमानाच्या इंजिनांना होणाऱ्या इंधनाच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवणारे स्विच होते बंद

## अहमदाबादमध्ये एअर इंडियाच्या विमान अपघात प्रकरण....अमेरिकन रिपोर्टमधून धक्कादायक दावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अहमदाबाद**

गेल्या महिन्यात एअर इंडियाच्या लंडनला जाणाऱ्या विमानाला अहमदाबाद विमानतळावरून उड्डाण केल्यावर काही मिनिटांमध्येच भीषण अपघात झाला होता. या अपघातात विमानामधील प्रवासी, कर्मचारी आणि हे विमान जिथे कोसळले त्या परिसरातील काही लोकांसह मिळून सुमारे २७५ जणांचा मृत्यू झाला होता. अत्यंत सुरक्षित समजल्या जाणाऱ्या ड्रिमलायनर विमानाला हा अपघात कसा झाला, याबाबत अनेक तर्कवितर्क लढवले जात आहेत. तसेच तपासामधून अपघाताच्या कारणांबाबत वेगवेगळी माहिती समोर येत आहे. दरम्यान, अमेरिकन प्रसारमाध्यमातील एका वृत्तामधून एअर इंडियाच्या विमानाला झालेल्या अपघाताबाबत धक्कादायक माहिती समोर आली आहे.



वॉल स्ट्रिट जर्नलमध्ये प्रसिद्ध झालेल्या वृत्तानुसार या विमानाने अहमदाबाद येथील विमानतळावरून उड्डाण केल्यावर विमानाच्या इंजिनांना होणाऱ्या इंधनाच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवणारे स्विच बंद केले गेले होते. त्यामुळे उड्डाण केल्यानंतर काही क्षणातच इंजिनामधील थ्रस्ट संपुष्टात आलं आणि विमान खाली कोसळलं.

दरम्यान, या विमान अपघाताबाबत आतापर्यंत करण्यात आलेल्या तपासामध्ये ड्रिमलायनर विमानामध्ये कोणत्याही प्रकारचा तांत्रिक दोष आढळून आलेला नाही. दरम्यान, या वृत्तामधून जो स्विच बंद झाल्याचे सांगण्यात येत आहे, त्याचा वापर हा वैमानिकांकडून इंजिन चालू, बंद करण्यासाठी आणि कुठल्याही आणीबाणीच्या प्रसंगामध्ये केला जातो. भारतामध्ये विमान अपघात तपास संस्थेचा अहवाल समोर येण्यापूर्वीच अमेरिकेमधून ही माहिती समोर आली आहे.

या अपघाताबाबत अमेरिकन अधिकाऱ्यांनी प्राथमिक तपासामधून समोर आलेल्या माहितीच्या आधारावर सांगितले की, या अपघाताचा तपास वैमानिकांनी केलेल्या कृतीवर केंद्रित आहे. वॉल स्ट्रिट जर्नलने या अपघाताचा तपास करणाऱ्या काही अमेरिकन अधिकाऱ्यांच्या हवाल्याने सांगितले की, प्राथमिक तपासामधून या विमानाच्या दोन्ही इंजिनांना इंधनाचा पुरवठा करणाऱ्या प्रवाहाला नियंत्रित करणारे स्विच बंद करण्यात आले होते, असे संकेत मिळत आहेत. त्यामुळे विमानाने उड्डाण करताच एवढा मोठा अपघात घडला.

या अपघाताबाबत माहित घेत असलेल्या लोकांनी दिलेल्या माहितीनुसार कॉकपीटमध्ये इंजिनाच्या कंट्रोल स्वीचच्या हालचालीवर तपास केंद्रित राहिला आहे. तसेच विमानाच्या इंजिनांना इंधनाचा पुरवठा करणारे स्विच बंद होते, असे प्राथमिक तपासामधून दिसून येत आहे.

# बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीनांवर मानवाधिकार उल्लंघनाचे आरोप
## मृत्यूदंड होण्याची शक्यता!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ ढाका**

बांगलादेशच्या सत्तेतून बेदखल करण्यात आलेल्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्यावर आता अधिकृतपणे गंभीर आरोप निश्चित करण्यात आले आहेत. तीन सदस्यीय विशेष न्यायाधिकरणाने त्यांच्याविरुद्ध मानवाधिकार उल्लंघना संबंधित पाच कलमांखाली खटला चालवण्यास मंजुरी दिली आहे.



हा तोच खटला आहे, ज्यात दोषी आढळल्यास मृत्यूदंडही दिला जाऊ शकतो. न्यायाधिकरणाने ३ ऑगस्टपासून फिर्यादी पक्षाचे युक्तिवाद ऐकण्याची तारीख निश्चित केली आहे. जर सर्व काही असेच सुरू राहिले, तर हा खटला बांगलादेशच्या इतिहासातील सर्वात मोठे राजकीय वळण ठरू शकतो.हे प्रकरण गेल्या वर्षीच्या एका मोठ्या जनआंदोलनाशी संबंधित आहे, ज्यात शेकडो विद्यार्थ्यांचा बळी गेला होता. या आंदोलनाला दडपण्यासाठी सरकारी यंत्रणेचा निर्दयीपणे वापर करण्यात आल्याचा आरोप आहे. या हिंसाचारात महिला आणि मुलांवरही हल्ले झाले, जखमींना उपचारही दिले गेले नाहीत आणि काही मृतदेह जाळण्यात आले होते.फिर्यादी पक्षाचे म्हणणे आहे की, या संपूर्ण कारवाईची योजना खुद्द हसीना यांनीच आखली होती.

# अजितदादा पवार महाजातीवादी; महाराष्ट्राच्या तिजोरीवर दिवसाढवळ्या दरोडा टाकतात, लक्ष्मण हाकेंची जीभ पुन्हा घसरली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११पुणे**

ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी पुन्हा एकदा उपमुख्यमंत्री अजित पवारांवर टीका केली आहे. यापूर्वी देखील लक्ष्मण हाके यांनी अजित पवारांवर शिवराळ भाषेत टीका केली होती. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे सुरज चव्हाण यांनी लक्ष्मण हाके यांना महाराष्ट्रात फिरू देणार नसल्याचा इशारा दिला होता. तर एका नेत्याने त्यांना नोटीस बजावली आहे. या नोटीसला प्रत्युत्तर देताना लक्ष्मण हाके यांची पुन्हा जीभ घसरल्याचे समोर आले आहे.

लक्ष्मण हाके यांना कायदेशीर नोटीस आल्यानंतर त्याला उत्तर देताना लक्ष्मण हाके यांनी अजित पवारांवर पुन्हा टीका केली आहे.



ते म्हणाले, अजितदादा पवार यांना आम्ही महाजातीवादीच म्हणणार आणि त्याचा पश्चाताप आम्हाला अजिबात वाटत नाही. कारण, या अजितदादा पवार यांनी ओबीसींचे वसतीगृह नाकारले आहे. ओबीसींच्या पोरांना फेलोशिप नाकारली. शोषित, वंचितांना निधी नाकारला. हाच अजितदादा पवार आपल्या आजारी कारखान्यांसाठी आताच्या अधिवेशनात पुरवणी मागण्यांमध्ये दोन हजार कोटीपेक्षा जास्त निधी मंजूर करून घेतो. ओबीसींचे भवितव्य असणाऱ्या ओबीसींच्या पोरांना शिष्यवृत्ती नाकारणाऱ्या अजितदादांना आम्ही हरामखोर म्हणू नये, तर काय म्हणावे?

होय मी हराददद म्हटलो आहे. त्यांनी मला काय नोटीस पाठवली आहे, ते मी बघून घेईल आणि अशा जर नोटीसा तुम्ही मला पाठवणार असाल तर आयला मायला म्हणणारे तुम्ही, या महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांना अमृत पाजणारे तुम्ही, लाईट गेली तर पोरं होतात, असा शोध लावणारे तुम्ही मग तुम्हाला आम्ही काय म्हणायचे? हे आम्ही आगामी काळात निश्चितपणे तुम्हाला सांगू असा इशारा लक्ष्मण हाके यांनी दिला आहे.

# एका दगडात दोन पक्षी, पंतप्रधान मोदींसह आरएसएस प्रमुख मोहन भागवतांनी निवृत्त व्हावे; काँग्रेसचा टोला

**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.११मुंबई**

राज्यात महापालिका, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग येत असून, दुसरीकडे बिहार निवडणुका आणि अन्य मुद्द्यांवरून राष्ट्रीय पातळीवरील राजकीय वातावरण तापताना पाहायला मिळत आहे. पंतप्रधान मोदी यांनी ७५ व्या वर्षी निवृत्त होण्यावरून काँग्रेससह अन्य विरोधी पक्ष भाजपावर टीका करत आहेत.



तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर निशाणा साधत आहेत. एका कार्यक्रमात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक यांनी सांगितलेल्या एका आठवणीचा संबंध पंतप्रधान मोदी यांच्या निवृत्तीशी जोडला जात आहे. परंतु, यातच आता पंतप्रधान मोदी यांच्यासह मोहन भागवत यांनीही निवृत्त व्हावे, असे काँग्रेस नेत्यांनी म्हटले आहे.

मोरोपंत पिंगळे एकदा म्हणाले होते की, जेव्हा पंचाहत्तरीची शाल अंगावर पडते त्याचा अर्थ आता थांबावे, तुमचे वय झाले आहे; बाजूला सरा, आम्हाला काम करू द्या, असा किस्सा मोहन भागवत यांनी एका कार्यक्रमात बोलताना सांगितला. परंतु, यावरून मोहन भागवत यांचा रोख पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे होता का? अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. पंतप्रधान मोदी आता ७५ वर्षांचे होत आहेत. त्यामुळे संघानेच आता मोदींना बाजूला होण्याबाबत संकेत दिले आहेत, असा दावा ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला होता. यानंतर आता काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश यांनी एक्सवर एक पोस्ट करत भाजपा, आरएसएसला टोला लगावला आहे.

# भाषा जोडण्याचे काम करते तोडण्याचे नाही
## उत्तर प्रदेश- महाराष्ट्राचे जुने नाते, राज ठाकरेंनी वाचले पाहिजे- बृजभूषण सिंह

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११लखनऊ**

उत्तर भारतीय नेते आणि माजी खासदार बृजभूषण शरण सिंह यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांच्यावर पुन्हा एकदा घणाघात केला आहे. भाषा लोकांना जोडते, ती तोडत नाही. महाराष्ट्र आणि उत्तर भारतीय यांच्यातील नाते तुमच्या वागण्यामुळे तुटणार नाही, असे ठामपणे सांगत त्यांनी राज ठाकरेंनी वाचले पाहिजे ते वाचत नाही असे



वाटते असा टोलाही लगावला आहे. बृजभूषण सिंह यांनी शिवाजी महाराजांचा दाखला देत सांगितले की, जेव्हा औरंगजेबाने छत्रपती शिवाजी महाराजांना आग्र्यात कैद केले, तेव्हा आमचे उत्तर भारतीय व्यापारी त्यांना मुक्त करण्यासाठी मदतीला धावून आले होते. आज ज्या इतिहासाचा अभिमान तुम्ही बाळगता, त्या इतिहासात उत्तर भारतीयांचेही योगदान आहे. बृजभूषण सिंह म्हणाले की, राज ठाकरे यांनी जेव्हा अयोध्येत येण्याचा कार्यक्रम निश्चित केला, तेव्हा मी त्यांना अयोध्येत येऊ न देण्याचा इशारा दिला होता. त्यावेळी राज ठाकरे यांनी आपला दौरा रद्द केला. परंतु आता पुन्हा आपले रंग दाखवत आहेत.

# कॅन्टीनमधील कर्मचाऱ्याला मारहाण प्रकरणात आ. संजय गायकवाड यांच्यावर अदखलपात्र गुन्हा नोंद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११मुंबई**

मंगळवारी शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी आकाशवाणी आमदार निवास येथील कॅन्टीनमधील कर्मचाऱ्याला मारहाण केली होती. खराब जेवण दिल्याचा आरोप करत त्यांनी कॅन्टीनमधील कर्मचाऱ्याला मारहाण केली होती. या मारहाणीचा व्हिडीओ देखील व्हायरल झाला होता. व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर संजय गायकवाड यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी विरोधकांकडून सुरू होती.

आता या प्रकरणात मोठी बातमी समोर आली आहे ती म्हणजे या प्रकरणात संजय गायकवाड यांच्यावर अखेर कारवाई करण्यात आली आहे. गायकवाड यांच्यावर अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मरिन ड्राईव्ह पोलिसांकडून अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



अमदार संजय गायकवाड आणि आणखी एका व्यक्तीच्या विरोधात अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. समाजमाध्यमातील व्हिडिओ आणि पोलीस कर्मचाऱ्याच्या तक्रारीच्या आधारावर अदलपात्र गुन्हा नोंदवण्यात आला आहे. दरम्यान आता या गुन्ह्याची माहिती पोलिसांकडून विधानसभा अध्यक्षांना कळवली जाणार आहे. सेक्शन ३५२, ११५ (२) अंतर्गत एनसी दाखल करण्यात आली आहे.

कुणी सभागृहात मुद्दा उपस्थित केला, तर मुख्यमंत्र्यांना विधानसभेच्या नियमाप्रमाणे बोलावं लागतं . त्यांनी त्यांचं कर्तव्य पार पाडलं, आम्ही काय फार मोठे काम केले नाही, की ज्यामुळे सरकार अडचणीत येईल. अशा अदखलपात्र गुन्ह्यात पोलिसांना फिर्यादी होता येत नाही. विरोधकांच्या समाधानासाठी मुख्यमंत्र्यांनी ते करायला सांगितलं असेल. मला पश्चाताप नाही . शिंदे साहेब मला फोनवर बोलले, राग कट्रोल करण्याचा सल्ला त्यांनी मला दिला असं यावेळी गायकवाड यांनी म्हटलं आहे.

# विरोधकांप्रमाणे घाम फुटलेला नाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी घेतली फिरकी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११मुंबई**

काँग्रेसप्रणित यूपीए सरकारने राज्यसभेत दिलेली माहिती वाचून दाखवली. यूपीए सरकारने यासंदर्भातील सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केले होते, तेही वाचून दाखवले. त्यामुळे कुठल्याही राजकीय भावनेने प्रेरित न होता, या महाराष्ट्राला भारतरत्न. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे संविधान दिले आहे, त्या संविधानानेच राज्य चालले पाहिजे. संविधान उलथवण्याचा प्रयत्न करणाऱ्या ज्या संघटना आहेत, त्यांच्यावर कारवाई करता यावी याकरता जनसुरक्षा विधेयक तयार करण्यात आले आहे. कोणीही या विधेयकाला थेट विरोध केला नाही,



याचा मला आनंद आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळ परिसरात पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी जनसुरक्षा विधेयक विधानसभेत मंजूर झाल्याबाबत सविस्तर प्रतिक्रिया दिली. जनसुरक्षा विधेयकामुळे देशविरोधी कृत्यांना आळा घालता येणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. तसेच जनसुरक्षा विधेयक विधासभेने मंजूर केले याचा आनंद आहे. या विधेयकावरील चर्चेच्या दरम्यान याबाबत ज्या काही शंका होत्या, त्या सर्वांचे उत्तर दिले आहे. विरोधकांनी जे आक्षेप घेतले होते, त्यावरही सविस्तर उत्तर दिले, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

यावेळी पत्रकारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विविध प्रश्न विचारले. पत्रकारांच्या प्रश्नांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तरे देत शंकांचे समाधान केले. परंतु, याचवेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, जरा एक मिनिट थांबा, घाम आला आहे, तो पुसून घेतो. आर्द्रता आहे. विरोधकांप्रमाणे घाम फुटलेला नाही, असे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी फिरकी घेतली.

# मुंबईतले सर्वधर्मीय १५०० भोंगे उतरवले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मोहिमेला यश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११मुंबई**

मुंबई पोलिसांनी ठरवले तर ते काहीही करू शकतात याची प्रचिती पुन्हा एकदा आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सक्रिय पाठिंबा आणि पोलिस दलाची इच्छाशक्ती यातून मुंबईतल्या वेगवेगळ्या धर्माच्या १५०० वास्तूंवरचे भोंगे उतरवण्यात मुंबई पोलिसांना यश आले आहे. यामुळे मुंबईसारखे महानगर धार्मिक स्थळांवरील भोंग्यांपासून मुक्त होण्याची ही पहिली वेळ आहे. मंदिर, मज्जिद, गुरुद्वारा, चर्च या धार्मिक स्थळांवरील भोंग्यांवरून देशभर सातत्याने वाद होत असताना मुंबईत ही अनोखी घटना घडली आहे. आता मुंबईतल्या कुठल्याही धार्मिक



स्थळावर एकही भोंगा उरलेला नाही. ही मोहीम प्रत्यक्षात उतरवण्याचे काम पोलिस आयुक्त देवेन भारती यांनी केले.

कुठलाही गाजावाजा न करता पडद्याआड दोन महिने ही मोहीम सुरू होती. याचा दर आठवड्याला मुख्यमंत्री फडणवीस स्वतः आढावा घेत होते. जिथे कोणी अडथळे निर्माण करत होते त्या ठिकाणीही ते स्वतः बोलत होते.

या विषयाला राजकीय रंग येऊ न देता सामोपचाराने हा विषय मार्गी लागण्यासाठीचे तसेच सामाजिक सलोखा बिघडू नये, अशी भूमिका मुख्यमंत्र्यांनी घेतल्याचे देवेन भारती म्हणाले, मुख्यमंत्र्यांची ही भूमिका सर्व समाजाच्या नेत्यांनी मान्य केली. कुठेही, कसलाही विरोध न होता सर्व धार्मिक स्थळावरचे भोंगे काढून टाकण्यास सगळ्यांनी सहकार्य केले. त्यामुळे आज मुंबईचा हा पॅटर्न महाराष्ट्र पॅटर्न म्हणून देशभर ओळखला जाईल.

## संपादकीय ......

# बालसुधारगृहे सुधारा

बालशिक्षणाची थोर परंपरा असलेल्या महाराष्ट्रात आज मात्र काही घटना अशा घडत आहेत की, ज्यामुळे समाज म्हणून आपण कुठे चाललो आहोत, अशी चिंता निर्माण झाली आहे. छत्रपती संभाजीनगर येथील 'विद्यादीप' बालसुधारगृहातील अल्पवयीन मुलींवर झालेल्या अत्याचाराची समोर आलेली घटना गंभीर आहे. बालसुधारगृहाची सुरक्षा व्यवस्था भेदून नऊ अल्पवयीन मुलींनी पलायन केले. त्यापैकी सात मुलींचा पाठलाग करून पोलिसांकडून त्यांना ताब्यात घेतले गेले. या घटनेने बालसुधारगृहाच्या व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. बालसुधारगृह हा तुरुंग वाटत असेल किंवा तेथे गैरप्रकार घडत असतील, तर त्याचे पर्यवसान अशा घटनांत होत असते. या सुधारगृहातील उघड झालेल्या घटनांनी सारा महाराष्ट्रच हादरला. सुधारगृहात मुलींचे साधे पोट दुखले, तरी प्रेग्नन्सी टेस्ट केली जाते. दुखणे कुठलेही असो, एक पांढरी गोळी उपचारासाठी दिली जाते. यातून काही मुलींना जंतुसंसर्गही झाला, असे सांगण्यात येते. दुखणे फारच गंभीर असेल, तर मुलींच्या अंगावर म्हणे 'पवित्र पाणी' शिंपडले जाते आणि कपाळावर क्रॉस काढले जाते. न ऐकल्यास मुलींना जबर मारहाण केली जाते.

एका मुलीला तर तोंडातून रक्त येईपर्यंत मारझोड करण्यात आली. झोपण्याच्या खोलीत कॅमेरे लावल्यामुळे, कपडेही कॅमेर्यासमोरच बदलावे लागतात, अशा तक्रारी आहेत. त्यामुळे हे बालसुधारगृह म्हणायचे की छळछावणी? असा प्रश्न निर्माण होतो. अल्पवयीन मुलींवर झालेल्या अत्याचार प्रकरणात दोषीवर कठोर कारवाई केली जाईल, जिल्हा महिला बालविकास अधिकार्याला तत्काळ निलंबित करण्यात येईल, चौकशी समितीचा अहवाल येताच सर्व दोषींवर गुन्हे दाखल करून कठोर कारवाई केली जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत केली आहे. याप्रकरणी चौकशीसाठी तीन वरिष्ठ महिला पोलिस निरीक्षकांच्या समितीची स्थापना केली असून, त्यांनी ८० मुलींशी संवाद साधला आहे. महिला पोलिसांजवळच या लहान मुली दुःख प्रकट करू शकतील. ज्या मुली गप्प बसून सर्व सहन करत होत्या, त्याही कदाचित बोलू लागतील. संबंधित संस्थेच्या मान्यतेची मुदत संपली असेल, तर ती पुन्हा देण्यात येणार नाही आणि मान्यता असेल, तर रद्द करण्यात येईल, हा सरकारचा निर्णय स्वागतार्ह आहे. धक्कादायक म्हणजे मुलींना जबरदस्तीने धर्मांतरासाठी भाग पाडले जात असल्याच्या तक्रारी असून, त्याची गंभीर दखल घेण्याची गरज आहे. त्यासाठी जबरदस्ती करणार्या महिलेवर गुन्हा दाखल करा, अशी मागणी विधान परिषदेत करण्यात आली आहे.सरकारने त्यात प्राथमिक तथ्य आढळल्यास या मागणीची अवश्य पूर्तता केलीच पाहिजे. २०१७ साली देखील नागपूरमधील शासकीय बालसुधारगृहातून १४ अल्पवयीन मुले पळाली होती. फरार मुलांमधील बहुतेक मुले परराज्यांतील होती. शहापूर येथील एका नामांकित शाळेत स्वच्छतागृहामध्ये रक्त सांडल्याचे आढळून आल्यानंतर, सव्वाशे विद्यार्थिनींची गणवेश काढून तपासणी केल्याची भयंकर घटना घडली. मुख्याध्यापकांच्या आदेशावरून, कोणाची मासिक पाळी आली आहे हे शोधण्यासाठी सहावी ते दहावीच्या विद्यार्थिनींची गणवेश उतरवून तपासणी करण्यात आली. विशेष म्हणजे शाळेमध्ये पाण्याचा अभाव असल्याने, मुलींनी भिंतीला पुसलेल्या रक्ताचे डाग प्रोजेक्टरमधून सर्व विद्यार्थ्यांना दाखवले गेले आणि विद्यार्थिनींच्या बोटांचे ठसे घेतल्याचा आरोप पालकांनी केला आहे. अर्थातच या प्रकारामुळे विद्यार्थिनी भेदरलेल्या असून, त्यांच्या मानसिक स्थितीवर गंभीर परिणाम झाला आहे. मुख्याध्यापिकांवर कारवाई झाली असली, तरी संस्थाचालक काय करत होते, असा प्रश्न पडतो. बदलापूरमध्ये गेल्या वर्षी चिमुकल्यांवर अत्याचार झाला, तेव्हाही संस्थाचालकांची बेपर्वाईच त्यास कारणीभूत ठरली होती.

उमलत्या वयातील मुलींना फुलांप्रमाणे जपणे आवश्यक असते. त्यांची काळजी घेण्याचे सोडून शारीरिक तपासणी करण्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला. विद्यार्थिनींना अंतर्वस्त्रे उतरवण्यास भाग पाडणार्या मुख्याध्यापिकेस आणि सफाई कामगार महिलेला पोलिसांनी अटक केली असून, संस्थाचालकांसह चार शिक्षकांवर 'पोक्सो'अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. पण यासाठी संतप्त पालकांवर आंदोलन करण्याची वेळ आली, हे लक्षात घेतले पाहिजे. २०२३ मधील एका अहवालानुसार, पुण्याच्या बालसुधारगृहात अवघ्या दोन वर्षांत जवळपास ७०० मुले दाखल झाली होती. शिक्षणाचा अभाव आणि व्यसनाधीनतेमुळे बालगुन्हेगारी वाढत चालली आहे. येरवड्यात मध्यंतरी किरकोळ कारणावरून चार अल्पवयीन मुलांनी एकाला कोयत्याने वार करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. वाईट संगत, गुन्हेगारीचे आणि झटपट पैसे मिळवण्याचे आकर्षण, पालकांच्या दुर्लक्षामुळे बालगुन्हेगारीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.

### शाळाबाह्य, अनियमित तथा स्थलांतरित विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण अनुषंगाने

# जिल्हाधिकारी सूचनेनुसार कार्यवाही करण्यास शिक्षण विभागाला आदेश

## अमरावती जिल्ह्यात १ जुलै ते १५ जुलैला होणार सर्व्हेक्षण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११अमरावती–** शाळाबाह्य अनियमित व स्थलांतरीत बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात दाखल करुन त्याचे शिक्षण अबाधीत राखण्यासाठी दिनांक ०१ जुलै २०२५ ते १५ जुलै २०२५ या कालावधीमध्ये सर्वेक्षण मोहीम राबवायची आहे. त्या अनुषंगाने दि. ०७/०७/२०२५ जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या अध्यक्षतेखाली यशस्वीपणे मोहीम राबविणेसाठी जिल्हास्तरीय समितीची बैठक घेण्यात आली. सदर सभेला मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. अमरावती संजिता महापात्र, जिल्हा पोलिस अधिक्षक यांचे प्रतिनिधी, प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अमरावती, महिला व बालविकास अधिकारी यांचे प्रतिनिधी, जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांचे प्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी, जिल्हा समन्वयक समग्र शिक्षा, शिक्षणाधिकारी माध्यमिक प्रिया देशमुख शिक्षणाधिकारी प्राथमिक सतिश मुगल, शिक्षण विस्तार अधिकारी प्रविण खांडेकर उपस्थित होते.

जिल्हाधिकारी यांनी शाळा बाह्यविद्यार्थी सर्वेक्षण प्रत्येक घरोघरी, बसस्थानक, रेल्वेस्थानक, सिग्नल्स, हॉटेल खानावळी, सार्वजनिक ठिकाणे, बाजार तळ, वीट भट्ट्या, या ठिकाणी जाऊन सर्वेक्षण करावे. शाळा बाह्य विद्यार्थ्यांचा शोध घ्यावा. एकही शाळाबाह्य किवा स्थलांतरीत बालक शिक्षणापासून वंचीत राहणार नाही याची काळजी घ्यावी.स्थलांतरीत होणाऱ्या प्रत्येक बालकांना शिक्षण हमी कार्ड द्यावे. स्थलांतरीत ज्या ठिकाणी बालके होतात त्या स्थळाच्या नजीकच्या शाळेमध्ये दाखल करून शिक्षकांकडे शिक्षण हमी कार्ड दाखवावे.

या सर्वेक्षणामध्ये स्वयंसेवी संस्थेचे प्रतिनिधी यांनी मदत करावी. विशेषतः माध्यमिक विभागाने मुलींचे शिक्षण अबाधीत राखण्यासाठी विशेष प्रयत्न करावे, वय वर्ष १८ पर्यंत मुलींना शिक्षणाचे प्रवाहात टिकवून ठेवावे. शाळा बाह्य सर्वेक्षण ०१ ते १५ जुलै २०२५ पर्यंत न करता प्रक्रिया वर्षभर चालू ठेवावी. असे आदेशीत केले आहे.जिल्हाधिकारी खालील प्रमाणे सूचना दिलेल्या आहेत.शाळाबाह्य, अनियमित तथा स्थलांतरित विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण शिक्षक व मुख्याध्यापक यांनी घरोघरी तसेच वाड्या, वस्त्या, तांडे, आठवडी बाजार, बस स्थानक विटभट्ट्या, हॉटेल्स, सिग्नल्स, शेत शिवार इत्यादी सर्व संभाव्य ठिकाणी जाऊन करावे.

विद्यार्थी सर्वेक्षण कार्यक्रमामध्येआपल्या तालुक्यात सक्रिय सामाजिक संस्थांचे सहकारी घेण्यात यावे. या करिता सोबत जोडेलेले पत्र संबंधित संस्थांना देण्यात यावे.

### एकही विद्यार्थी शाळाबाह्य

राहणार नाही याची दक्षता घ्यावी स्थलांतरित होणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षण हमी कार्ड देण्यात यावे. नियमितपणे स्थलांतर होणाऱ्या गावातील शाळांमधील १०० % विद्याथ्यर्थ्यांचे शिक्षण हमी कार्ड तयार करून स्थलांतराच्या वेळेपूर्वी विद्यार्थ्यांच्या पालकांकडे हस्तांतरित करावे. स्थलांतरित होणारे (आलेले व गेलेले) विद्यार्थी शाळेत दाखल झाले असल्याबाबत मुख्याध्यापकांकडून हमीपत्र घ्यावे. सतहलांतर होणारे विद्यार्थी कुठे सतहलांतरीत होणारआहेत याची संभाव्य / माहितीची नोंद शाळेत ठेवण्यात यावी.विद्यार्थी शोध मोहिमेचा प्रचार,प्रसार करावाआदिवासी क्षेत्रामध्ये माता मृत्यूचा दराचा संबंध शिक्षणाशी आहे. इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये विद्यार्थीनींची गळती मोठ्या प्रमाणावर होते. त्यामुळे बालविवाहाचे प्रमाण वाढून आरोग्य विषयक समस्या वाढतात. त्यामुळे विद्यार्थीनींच्या गळतीचे प्रमाण कमी करून किमान १८ वर्षे वयापर्यंत शाळेत टिकवून ठेवण्यात यावे.शाळाबाह्य विद्यार्थ्यांच्या समस्या निरकरणाकरिता केले जाणारे प्रयत्न केवळ औपचारिकता न राहता कक्षेबाहेर जाऊन काम करणे आवश्यक आहे. शाळाबाह्य विद्याथ्यांची माहिती सामान्य नागरिकांकडून प्रशासनाला प्राप्त व्हावी याकरिता संपर्क क्रमांक ८८८८२१६१३९ ९१५६३७८८८७ या दोन क्रमांकाचा प्रचार प्रसार करावा. अश्या सुचना जिल्हाधिकारी यांनी या बैठकीत दिल्या आहे




## उपचार मुलांच्या वाकड्या दातांवर

**दि. ११विदर्भ प्रजासत्ताक**

किशोरवयीन वय हा शारीरिक आणि मानसिक वाढीचा महत्त्वाचा काळ असतो. या वयात शरीरात झपाट्याने बदल होतात. यामध्ये दातांची रचना व स्थितीदेखील महत्त्वाची भूमिका बजावते.काही मुलांचे दात जन्मतःच किंवा वय वाढताना वाकडे-तिकडे वाढतात. अशा वेळी योग्य वेळी उपचार न झाल्यास मुलांच्या आत्मविश्वासावर, बोलण्यावर, खाण्यावर आणि चेहर्याच्या सौंदर्यावर परिणाम होऊ शकतो.



**दात वाकडे होण्याची कारणे**

१. आनुवंशिकता : पालक किंवा कुटुंबातील इतर सदस्यांचे दात वाकडेतिकडे असतील, तर मुलांच्या दातांची ठेवण तशीच असू शकते. जबड्याचा आकार लहान असून दात मोठे असतील, तर ते नीट बसत नाहीत.

**२. बालपणीच्या सवयी :** अंगठा चोखणे, ओठ चोखणे, जीभ बाहेर काढून ठेवणे, तोंडाने श्वास घेणे या सवयी जबड्याच्या वाढीवर आणि दातांच्या स्थितीवर परिणाम करतात.

**३. दुधाचे दात :** दुधाचे दात वेळेपूर्वी पडले किंवा काढावे लागले, तर त्या जागेवर कायमचे दात चुकीच्या ठिकाणी येण्याची शक्यता वाढते.

४. दातांची अतिरिक्त वाढ किंवा कमी संख्या : काही वेळा अतिरिक्त दात उगम पावतात, जे इतर दातांची जागा अडवतात. कधी काही दात येत नाहीत. त्यामुळे पोकळी निर्माण होते.

काही वेळा वाकड्या दातांमुळे स्पष्ट उच्चार करणे कठीण होते.

अन्न चावण्याच्या खाण्याच्या क्रियेत अडथळा येतो. परिणामी, पचनावरही याचा परिणाम होतो.

वाकडे दात योग्य प्रकारे ब्रश न झाल्यास तिथे अन्न अडकते. जंतू वाढतात आणि दात सडण्याची शक्यता वाढते.

बरेचदा समाजात वावरताना मुलांना संकोच वाटतो.

**उपचाराचे पर्याय–** किशोरवयीन मुलांमध्ये वाकडे दात सुधारण्यासाठी वेगवेगळे पर्याय आहेत.

**१. मेटल ब्रेसेस :** ही पारंपरिक पद्धत असून आजही ती अत्यंत प्रभावी मानली जाते. स्टीलच्या वायर्स व ब्रॅकेट्स् वापरून दातांना योग्य स्थितीत आणले जाते.

**२. सिरॅमिक ब्रेसेस :** हे धातूच्या ब्रेसेससारखेच कार्य करतात; परंतु ते सिरॅमिकपासून बनलेले असल्याने रंगाने दातांसारखेच दिसतात.

**३. लिंग्वल ब्रेसेस :** हे ब्रेसेस दातांच्या आतील बाजूस बसवले जातात. त्यामुळे दिसत नाहीत.

**४. अलायनर्स :** ही आधुनिक आणि सौम्य पद्धत आहे. पारदर्शक प्लास्टिकचे

# मसाल्याची राणी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'काळीमिरी'ची लागवड कशी केली जाते

**दि.११ विदर्भ प्रजासत्ताक**

गरम मसाल्यातील 'काळीमिरी' हा महत्त्वपूर्ण घटक आहे. लागवडीनंतर तिसऱ्या वर्षापासून उत्पादन सुरू होते. आठव्या वर्षापासून भरपूर उत्पादन मिळते. एप्रिल जून महिन्यात मोहोर येऊन जानेवारी-मार्चमध्ये फळे तोडण्यास तयार होतात.

**कशी कराल लागवड?**

सुपारीच्या बुंध्यापासून पूर्वेस ६० सेंटीमीटर अंतरावर तर नारळाच्या बुंध्यापासून एक मीटर अंतरावर उत्तरेस ३० बाय ३० बाय ३० सेंटीमीटर आकाराचे दोन खड्डे खणावेत.

प्रत्येक खड्ड्यात दोन घमेली कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत आणि अर्धा किलो सुपर फॉस्फेट वरच्या थरात मिसळावे.

प्रत्येक खड्यात मुळे फुटलेले एक रोप लावावे.

मुख्य पिकासाठी २.५ बाय २.५ मीटर ते ३.० बाय ३.० मीटर अंतरावर सिल्व्हर ओक किंवा भेंड रोपे मिरी लावण्याच्या एक वर्ष अगोदर लावून घ्यावेत.

नंतर प्रत्येक खुंट झाडाजवळ ४५ सेंटीमीटर अंतर सोडून पूर्व आणि उत्तर दिशेस मुळ्या फुटलेली छाट कलमे लावावीत.

सांडपाण्याचा उपयोग करून घराजवळील शोभेच्या झाडावर, फणसावर काळी मिरी वेलांची लागवड करता येते.

**लागवडीनंतरची काळजी**

लागवडीनंतर मिरीचे वेल झाडावर व्यवस्थित चढण्यासाठी दोर सैल बांधून घ्यावा.

वेलाची उंची सहामीटरपेक्षा वाढू देऊ नये.

भेंड, सिल्व्हर ओक, पांगारा यांच्या खुंटावर काळ्या मिरीचे पीक घेतले असल्यास खुंटाची उंची आठ मीटरपेक्षा जास्त वाढू देऊ नये.

एप्रिल-मेमध्ये फांद्याची छाटणी करून योग्य प्रकारची सावली द्यावी.

वेलाला हिवाळ्यात ७ ते ८ तर उन्हाळ्यात ४ ते ५ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे.

**खत व्यवस्थापन**

तीन वर्षापासून पुढे प्रत्येक वेलास २० किलो शेणखत/ कंपोस्ट, ३०० ग्रॅम युरिया, ५०० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट व २५० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश द्यावे.

ही खते दोन समान हप्त्यात ऑगस्ट-सप्टेंबर व जानेवारी-फेब्रुवारीत द्यावीत.

खत जमिनीच्या पृष्ठभागावर वेलीभोवती पसरून द्यावे. विळा अथवा खुरप्याच्या सहाय्याने जमिनीत मिसळावे.

वेलीचे प्रखर उन्हापासून संरक्षण करावे.

काळी मिरीचे उत्पन्न वाढविण्यासाठी प्रति मिरी वेलावर जून, सप्टेंबर, ऑक्टोबर व नोव्हेंबर या महिन्यात २५ टक्के आठ दिवस साठवलेल्या गोमूत्राची फवारणी व २५ टक्के द्रावणाची जमिनीत जिरवणी करावी.

**पिक संरक्षण**

काळीमिरी वेलीचे पोलूभुंगा किडीपासून संरक्षण करण्यासाठी जुलै, ऑक्टोबर महिन्यात मॅलॅथिऑन या औषधांचा फवारा द्यावा.

जलद व हळूवार मर व इतर रोगापासून संरक्षण करण्यासाठी पावसाळा सुरू होताच संपूर्ण वेलावर व त्यानंतर २० दिवसांच्या अंतराने दोन वेळा एक टक्का बोर्डो मिश्रण वेलीवर फवारावे.

तसेच १० टक्के बोर्डोपेस्ट एक मीटर उंचीपर्यंत वेलीवर लावावी. रोगट पाने, मेलेल्या वेली मुळासह काढून जाळून टाकावीत.




**कशी कराल काढणी?**

मिरीच्या घोसातील १ ते २ दाणे पिवळे किंवा तांबडे लाल होताच मिरीचे सर्व घोस काढावेत.

घोसातील दाणे वेगळे करून बांबूच्या करंडीत किंवा मलमलच्या कापडात भरून उकळत्या पाण्यात एक मिनिट बुडवावेत.

उकळत्या पाण्यात बुडवलेली मिरी उन्हामध्ये ३ ते ४ दिवस चांगली वाळवावी.

वाळल्यानंतर दाण्यांना सुरकुत्या पडतात व गडद काळा रंग येतो.

हिरव्या मिरीच्या दाण्यावरील साल काढून पांढरी मिरी करता येते.

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने
देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

# खरीप हंगामासाठी राज्यस्तरीय पीकस्पर्धा जाहीर:

## शेतकऱ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११अमरावती,**

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाने खरीप हंगाम २०२५ साठी राज्यस्तरीय पीकस्पर्धेचे आयोजन केले असून, या माध्यमातून प्रयोगशील शेतकऱ्यांना प्रोत्साहन देऊन राज्याच्या कृषी उत्पादकतेत वाढ करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या स्पर्धेत भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी (रागी), तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमूग आणि सूर्यफूल या ११ प्रमुख पिकांचा समावेश आहे. मूग आणि उडीदसाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख ३१ जुलै २०२५ असून, इतर पिकांसाठी ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत मुदत आहे.जिल्ह्यातील शेतकऱ्यांना या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, राहुल सातपुते यांनी केले आहे.स्पर्धेसाठी सर्वसाधारण गटाला प्रति पीक ३०० रुपये तर आदिवासी गटाला १५० रुपये प्रवेश शुल्क आकारले जाईल. शेतकऱ्याच्या नावावर जमीन असणे आणि ती तो स्वतः कसत असणे आवश्यक आहे. भात पिकासाठी किमान २० आर आणि इतर पिकांसाठी ४० आर (१ एकर) क्षेत्रावर सलग लागवड असणे बंधनकारक आहे.ही स्पर्धा तालुकास्तरावर आयोजित केली जाईल आणि विजेत्यांना राज्य, जिल्हा व तालुका पातळीवर आकर्षक रोख बक्षिसे दिली जातील. तालुका पातळीवर ५,००० रुपये, जिल्हा पातळीवर १०,००० रुपये, तर राज्य पातळीवर ५०,००० रुपयांपर्यंतचे पहिले बक्षीस मिळेल.इच्छुक शेतकऱ्यांनी विहित नमुन्यातील अर्ज, शुल्क भरल्याचे चलन, ७/१२ उतारा, जात प्रमाणपत्र (आदिवासी असल्यास), पिकाच्या क्षेत्राचा नकाशा आणि बँक पासबुकच्या पहिल्या पानाची प्रत या कागदपत्रांसह संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयात अर्ज सादर करावा. अधिक माहितीसाठी, कृषी विभागाच्या www.krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या किंवा स्थानिक कृषी अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब – पोर्टल /ई – पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

शुक्रवार दि. ११ जुलै २०२५

शहर/ग्रामिण


# धावत्या बसला आग, प्रवाशांच्या खिडकीतून उड्या

## पंचवटी चौकात भयावह थरारसुदैवाने जीवित हानी नाही





**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अमरावती**

बहुतांश वेळी शिवशाही वा ट्रॅव्हल्सला आग लागण्याच्या घटना उन्हाळ्याच्या दिवसात घडतात. पण, गुरुवारला रात्री ९.३० वा. सुमारास पंचवटी चौकात एका धावत्या बसच्या इंजिनला आग लागल्याने मोठी खळबळ उडाली. यावेळी बसमध्येबसलेल्या काही प्रवाशांनी भितीपोटी आग विझविण्याची वाट न पाहता, जीव वाचविण्यासाठी थेट बसच्या काचा फोडत खिडकीतून बाहेर उड्या मारल्या. तर आतमधील लोकांचा काही वेळ थरकाप उडाला होता. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार गुरुवारला रात्री ९.३० वा. सुमारास एमएच १४ बीटी ३८७० क्रमांकाची छत्रपती संभाजीनगर ते नागपूर ही बस पंचवटी चौकातून जात होती. उड्डाणपुलाखालून जात असताना या धावत्या बसच्या इंजिनमधून धुर निघताना चालकाला दिसले. पाहता पाहता चालकाच्या बाजुच्या भागाने पेट घेतल्याने गोंधळ उडाला. चालकाने सतर्कता दाखवत रोडच्या बाजुला बस थांबविली आणि आग विझविण्याचाचालक व वाहकाने प्रयत्न सुरु केला. मात्र चालकाच्या बाजुच्या भागातून निघणारा धूर आणि आग पाहताच बसमध्ये बसलेल्या प्रवाशांमध्ये गोंधळ निर्माण झाला.समोरून बाहेर पडावेकी काय करावे ? असा प्रश्न पडला. काहींच्या तर जीवाचा थरकाप उडाला... त्यामुळे काही मागे पुढे न पाहता काही प्रवाशांनी थेट बसच्या काचा फोडून खिडकीतून बाहेर उड्या मारत आपला जीववाचविण्याचा प्रयत्न केला. यावेळी बसमध्ये१७ प्रवासी होते. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही आणि मोठी दुर्घटना थोडक्यात टळली. चालक आणि वाहकाने मोठ्या हुशारीने आग विझविली. त्यानंतर दुसरी बस बोलावून प्रवाशांना नागपूरच्या प्रवाशांना रवाना करण्यात आले. सध्या बस पंचवटी येथील उड्डाणपुलाखाली उभी आहे. बसला आग लागल्यानंतर पंचवटी चौकात बघ्यांची मोठी गर्दी जमली होती.

# संत नगरीत भक्तिरसाची उधळण; शेगावात गुरुपौर्णिमेला गर्दीचा शिखर



**विदर्भ प्रजासत्ताक दि.११शेगाव–** भारतीय संस्कृतीत गुरूंचे अनण्यसाधारण महत्व आहे. गुरूला ब्रम्हा, विष्णू, महेश या त्रिमूर्ती पेक्षा जास्त महत्व देण्यात आले आहे. अशा गुरूचे गुरुपौर्णिमेला भक्त गण वंदन करतात, गुरु पौर्णिमेच्या पर्वावर संत गजानन महाराजांनाच आपला गुरु मानणाऱ्याविदर्भासह राज्यातील भाविकांची गुरूवारी विदर्भ पंढरी शेगाव मध्ये मांदियाळी झाली.

संत गजानन महाराजांचा दिवस गुरुवारीच यंदाची गुरु पौर्णिमा आल्याने हजारो भाविकामध्ये एक वेगळाच उत्साह दिसून आला. हजारो भाविकांचा मेळा, महाराजांच्या शिष्यानी फुलेलेले संत गजानन महाराज संस्थान मंदिर, समाधी स्थळाच्या दर्शनासाठी लागलेल्या दीर्घ रांगा, 'गण गण गणात बोते च्या गजराने दुमदूमणारा मंदिर परिसर, भाविकांनी फुललेले मंदिराकडे येणारे रस्ते असे गुरुवारी, संतनगरीचे चित्र होते.

नुकताच आषाढी एकादशी सोहळा पार पडला. या दिवशी लाखावार भाविकांनी शेगाव नगरीत हजेरी लावली आणि ते समाधी स्थळी नतमस्तक झाले. मात्र तरीही जेमतेम पाच दिवसांच्या अंतराने हजारो भाविकांनी गुरु पौर्णिमा निमित्त गुरु चरणी लीन होण्यासाठी संत नगरीत हजेरी लावल्याचे दिसून आले.आज गुरुवारी सकाळ पासूनच भाविकांचे आगमन सुरु झाले. दुपारी बुलढाणा जिल्ह्यासह विदर्भ आणि राज्यातील भाविक यांची गर्दी वाढली. यामुळे सकाळ च्या तुलनेत संस्थान मंदिर परिसरात दर्शनसाठी दीर्घ रांगा लागल्याचे चित्र होते. सकाळी अर्धा एक तासात होणाऱ्या दर्शनसाठी दीड दोन तास लागत होते.

गजानन महाराजांनी शेगाव नगरीत दीर्घ काळ वास्तव्य केले. महाराजांनी भक्तांना मार्गदर्शन केले आणि त्यांच्या व्यथा, संकटे दूर केली. यामुळे पिढ्यानं पिढ्या त्यांना भाविकांनी दैवत आणि गुरु मानले. ही गुरु शिष्यची परंपरा आजच्या संगणक युगातही कायम आहे.

अनेक लोक त्यांना गुरु मानू लागले. म्हणूनच आज संत नगरीत शेगावात भाविक शिष्यांची दर्शनासाठी तोबा गर्दी उसळल्याचे दिसून आले. गुरु पौर्णिमा च्या पावन पर्व वर शेगाव नगरीत पारंपरिक उत्साह आणि भक्तीचे पवित्र वातावरण तयार झाले.

# धारणी प स तील कंत्राटी अभियंत्याला दहा हजाराची लाच घेताना अटक

## लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई घरकुल लाभार्थ्याकडून स्वीकारली लाच




**विदर्भ प्रजासत्ताक दि.११धारणी–** धारणी पंचायत समितीमध्ये कार्यरत कंत्राटी कर्मचारी पंकज रमेशराव लिंघोट याला गुरुवारी पंचायत समिती कार्यालयातच घरकुल लाभार्थ्याकडून घरकुलाचां हप्ता देण्यासाठी दहा हजाराची लाच घेताना लाच लुचपत प्रतिबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी रंगेहात पकडले आहेप्राप्त माहिती नुसार धारणी पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या दूनी गावांमध्ये एका घरकुल लाभार्थ्याला रमाई आवास योजनेतून घरकुल मंजूर झाले होते त्या घरकुलाचा तिसरा हप्ता त्या लाभार्थ्यांना मिळावा याकरिता लाभार्थ्यांने कंत्राटी अभियंता पंकज रमेशराव निंघोट, वय ३० वर्ष, पद ग्रामीण गृहनिर्माण अभियंता (ठक्ए) पंचायत समिती धारणी,मूळ रहिवासी गाव शेंदो ळा ता तिवसा हल्ली मुक्काम रा, धनई नगर, धारणी यांच्याकडे संपर्क साधला असता पंकज निघोट यांनी तक्रारदारास घरकुलाच्या तिसऱ्या हप्त्याचा चेक लागत असेल तर १५००० रूपयाची लाच मागितली त्याबाबत तक्रार दाराने लाच लुचपत विभागाकडे तक्रार केली होती त्या तक्रारी वरून गुरुवारी पंचायत समिती कार्यालय धारणी येथे दुपारी चार वाजता च्या दरम्यान सापळा रचून आरोपी पंकज निघोट याने तक्रारदारा कडून शासकीय पंचासमक्ष दहा हजार रुपयाची नगदी लाच स्वीकारली व पाच हजार नंतर देतो म्हणून सांगितले असता दबा धरून बसलेल्या अधिकाऱ्यांनी त्याला रंगेहाथ पकडुन त्यांचेविरुध्द पो.स्टे. धारणी येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.सदरची कार्यवाही मारुती जगताप, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती परिक्षेत्र सचिन्द्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, लाचल्चपत प्रतिबंधक विभाग,अमरावती परिक्षेत्र, सुनिल किनगे, पोलीस उपअधिक्षक, ला. प्र. वि अमरावती, यांचे मार्गदर्शना खाली पो.नि. सुजाता बन्सोड, पोनि मेसरे, पो.नि ज्ञानोबा फड़, पो. अंमलदार प्रमोद रायपुरे, शैलेश कडु, आशिष जांभोळे, चालक पोउपनि सतीश कीटुकले, पोहवा शेंडे यांनी केली.

# शहरातील फुटपाथ मोकळा श्वास घेणार

## फुटपाथवरच्या अतिक्रमणधारकांवर होणार कारवाई

### मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अमरावती –** महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी मिशन फ्री फुटपाथ मोकळे हे विशेष अभियान तात्काळ अ राबविण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. अनेक ठिकाणी व्यावसायिक दुकानदारांनी रस्ते व लगतच्या पादचारी मार्गावर अनधिकृत कच्चे व पक्के बांधकामे करून अतिक्रमण केल्याने वाहतूक व नागरिकांची सुरक्षितता धोक्यात आली आहे. ही सर्व अतिक्रमणे स्वतःच्या हातांनी हटवा अन्यथा कारवाईसाठी तयार राहण्याचा इशारा देण्यात आला आहे.

महानगरपालिकेने या पायाभूत सुविधांसाठी शासकीय निधी खर्च करून कामे केली आहेत. मात्र अतिक्रमणामुळे या सुविधांचा उपयोग होऊ शकत नाही, हे लक्षात घेऊन आयुक्तांनी कठोर पावले उचलण्याचे ठरविले आहे. आयुक्तांनी दिलेल्या सूचनांनुसार, अमरावती महानगर पालिका क्षेत्रात सर्वच अतिक्रमणांची तातडीने तपासणी (सर्वेक्षण) करून त्यावर नियमानुसार कारवाई करण्यात यावी. तसेच हे फुटपाथ मोकळे अभियान दररोज राबवले जावे व त्याचा अहवालही नियमितपणे सादर करावा, असेआदेश देण्यात आले आहेत. मोहिमेचा उद्देश पादचाऱ्यांना सुरक्षित आणि मोकळा मार्ग उपलब्ध करून देणे हा असून नागरिकांनी हीयास सहकार्य करावे, असे आवाहन महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी केले आहे.

### शहरात अतिक्रमणाची गंभीर स्थिती

अमरावती शहरातील अतिक्रमणाची समस्या वसेंदिवस गंभीर होत चालली आहे. रस्त्याच्या डेला किवा जिथे जागा दिसते तिथे अतिक्रमण ले जात आहे. काही लोक कायमस्वरूपी शेड बंधून अतिक्रमण करत आहेत. या अतिक्रमणांमुळे शहरात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. आता महापालिका प्रशासनाने या सर्व अतिक्रमण हटविण्याची मोहिम रडारवर घेतली आहे. सर्व अतिक्रमणे स्वतःच्या हातांनी हटवा अन्यथा कारवाईसाठी तयार राहण्याचा इशारा मनपा आयुक्तांनी दिला आहे.


फुटपाथ हे पायदळ चालणाऱ्यांसाठी आहे, हॉकर्ससाठी नाही. या ठिकाणी अतिक्रमण झाल्यामुळे ये-जा करणाऱ्या सामान्य नागरिकांना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे फुटपाथसह अन्यत्र केलेले अतिक्रमण स्वतः काढून टाका अन्यथा महानगरपालिका प्रशासन ते काढून टाकेल आणि कायदेशीर कारवाई देखील केली जाईल, असा इशारा मनपा आयुक्तांनी दिला. शहरातील रस्ते आणि फुटपाथ खुले होईपर्यंत ही अतिक्रमणहटाव कारवाई सुरूच राहील.

### अतिक्रमण हटाव कारवाई जोरात

मनपाच्या अतिक्रमण हटाव विभागाव्दारे शहरात जोरात मोहिम सुरु आहे. विशेष म्हणजे शहरातील हॉकर्स झोनमधील अतिक्र मण हटविण्याबाबत मनपा प्रशासन व पोलिस विभागाचीबैठकझाली होती. त्यानंतर या मोहिमेला जोरात सुरुवात झाली आहे. बुधवारला रात्री इतवारा बाजारातील भाजीपाला बाजार, मटण बाजार आणि आजूबाजूचा परिसर आणि राज कमल चौक ते गांधी चौक आणि आंबागेट या भागातील अतिक्रमण हटवण्यात आले. इतवारा बाजार आणि भाजी मार्केटमधील काही दुकानदारांना कचऱ्याचे डबे नसल्याबद्दल दंडही ठोठावण्यात आला

# सपन प्रकल्पाच्या दोन दरवाज्यातून पाण्याचा विसर्ग

## नागरीकांना अर्लट राहण्याचे आवाहन



**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अमरावती –** गेल्या तिन दिवसापासुन सुरू असलेल्या संततधार पावसामुळे पाण्याच्या पातळीत वाढ झाल्याने सपन प्रकल्पाच्या दोन दरवाज्यातून विसर्ग करण्यात येत आहे. सपन मध्यम प्रकल्पाच्या जलाशय प्रचलन सुची प्रमाणे जुलै महीण्याच्या अखेर जलाशय पातळी ५०६.५०० मी व पाणी साठा २५.३४ दलघमी (६३.४२%) असणे अपेक्षीत आहे. बुधवार दि. ९ रोजी सनप प्रकल्पाची जलाशय पातळी ५०८.५५० मी असुन पाणी साठा २७.२३ दलघमी (७०.५५%) आहे. तसेच प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये संततधार पाऊस सुरु असल्यामुळे जलाशय पातळी प्रचलनाच्या दृष्टूया येत्या २४ तासा मध्ये सपन मध्यम प्रकल्पाचे २ दरवाजे १० से.मी. उंचीणे उघडुन नदीपात्रा मध्ये पाण्याचा विसर्ग सोडण्यात येत आहे. तरी आपल्या स्तरावरुन सपन नदी काठच्या गावांना सावध राहण्याबाबत तसेच नदी पात्रामध्ये वावरण्यास प्रशासनाकडून मज्जाव करण्यात आला आहे.

# पोलीस आयुक्त अरविंद चावरीया यांच्या अध्यक्षतेखाली स्कूल बस सुरक्षितता समितीची बैठक



**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अमरावती**

पोलीस आयुक्तालयात गुरुवारी पोलीस आयुक्त अरविंद चावरीया यांच्या अध्यक्षतेखाली अमरावती जिल्हा स्कुल बस सुरक्षीतता समिती बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदर बैठकीत विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीबाबत संबंधितांना दिशानिर्देश देण्यात आले.

बैठकीला जिल्हा स्कुल बस समितीचे नामनिर्देशित सचिव प्रादेशिक परिवहन अधिकारी श्रीमती उर्मीला पवार अमरावती, उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे उपस्थित होते. सदर बैठकी दरम्यान ५ फेब्रुवारी रोजी झालेल्या जिल्हा स्कुल बस सुरक्षीतता समिती अमरावती सभे मध्ये घेतलेल्या निर्णयाचा आढावा घेण्यात आला.

बैठकी दरम्यान जिल्हा स्कुल बससुरक्षीतता समिती अमरावतीचे नामनिर्देशित अध्यक्ष पोलीस आयुक्त अरविंद चावरीया यांनी शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांची वाहतुक अपघात विरहीत व सुरक्षीत व्हावी, याबाबीवर विशेष भर दिला. अध्यक्षांनी अमरावती शहर व जिल्ह्यातील सर्व शाळां मध्येतात्काळ शालेय परिवहन समितीची स्थापना करण्याबाबत उपस्थित शिक्षण विभागाचे अधिकारी व शाळेचे मुख्याध्यापक यांना आवश्यक सुचना देवुन या समितीची तिन महीन्यात एकदा बैठक घेण्यात यावी याबाबत सुचित केले.

शालेय विध्यार्थ्यांची वाहतुक सुरक्षीत करण्यासाठी शाळा द्वारे शाळा सुटण्याचे व स्कुल बसचे वेळा पत्रक तयार करुन एकाच वेळी होणारी विद्यार्थ्यांची गर्दी कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याबाबत मार्गदर्शन करुन विद्यार्थ्यांचे सुरक्षीततेे करीता शाळेच्या प्रवेश द्वारावर सिसिटिव्ही व आवश्यक खाजगी सुरक्षा रक्षक नेमण्याबाबत सुचीत केले.

वाहतुक विभागाच्या सहकार्याने सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांना वाहतुकीचे नियम व रस्ते सुरक्षा बाबत माहीती देण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन करुन वाहतुक विभागाचे अधिकारी यांना मार्गदर्शन करण्याकामी बोलाविण्यात यावे. यावावत सुचना देण्यात आली.

बैठकीस उपस्थित जिल्हा स्कुल बस संघटनेचे पदाधिकारी यांना विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकी करीता स्कुल बसची नियमीत देखभाल करणे, कागदपत्र सोबत बाळगणे, वाहना मध्ये स्पीड गर्व्हनसब बसविणे, अग्नीशमन यंत्रणा, प्रथमोपचार पेटी संकटकालीन

बैठकी दरम्यान उपस्थितांनी मांडलेले प्रश्न जाणून घेवुन त्यावरील उपाययोजना संबंधाने संबंधीत विभागा कडुन त्याबाबतची पुर्तता करुन घेण्यासाठी आवश्यक पत्र व्यवहार करण्यात येईल, असे अध्यक्ष व सचिव यांनी उपस्थितांना आश्वासीत केले. या बैठकीचा महत्वाचा उद्देश शालेय विद्यार्थ्यांची सुरक्षीत वाहतुक करणे हा असल्याने याबाबत सर्व शासकीय विभागाचे अधिकारी यांनी आप आपले कर्तव्य प्रामाणीकपणे बजावणे बाबत आदेशित करण्यात आले.

सदर बैठकीस सहायक पोलीस आयुक्त वाहतुक संजय खताळे, पोनि प्रवीण बांगे, वाहतुक शाखेच्या निरीक्षक श्रीमती रिता उईके, श्रीमती ज्योती विल्हेकर, जिल्हा वाहतुक शाखेचे सतीश पाटील, प्राथमिक शिक्षणाधिकारी संगीता सोनोने शिक्षणअधिकारी (प्राथमिक), शिक्षणाधिकारी (माध्यमीक) निखील मानकर, योगेश ठाकरे, शुभम शेरेकर, मनपा प्रतिनिधी, प्रविण ठाकरे, मनपा शिक्षण विभाग, उकेश गोंडीक, शहरातील विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, शालेय स्तरीय वाहतुक समितीचे अध्यक्ष मोठ्यासंख्येने उपस्थित होते. तसेच वाहतुक संस्थेचे पदाधिकारी रविन्द्र गुल्हाने, राहुल इंगळे, गजानन राजुरकर, सागर डवरे, बंडु कथलकर आदी उपस्थित होते.

# राष्ट्रसंतांच्या महासमाधीस्थळी गुरुपौर्णिमा महोत्सव

## गुरुकुंज मोझरीत हजारो भाविकांची उपस्थिती




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११गुरुकुंज मोझरी**

अखिल विश्वाला मानवतेचा संदेश देणाऱ्या राष्ट्रसंत तुकडोजी तुकडोजी महाराज यांच्या महासमाधीस्थळीं एक दिवसीय गुरुपौर्णिमा महोत्सवाला आज पहाटे ब्रह्ममहुर्तावर तीर्थस्थापना व सामुदायिक ध्यानाने या कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. यावेळी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची महासमाधी दिव्यांचा लख्ख प्रकाशाने, विविध आकर्षक रंगीबेरंगी फुलांनी सजविण्यात आली होती. सकाळपासून भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती.

गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वावर गुरुवारी हजारो गुरुदेवप्रेमींनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजाना गुरुस्थानी ठेऊन आदरांजली अर्पण केली. या दिमाखदार सोहळ्यात तमाम गुरुदेव प्रेमींनी प्रचंड गर्दी केली होती ब्राह्ममहुर्तावर पहाटे चार वाजता राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या महासमाधीला यावेळी अभिषेक करण्यात आला. गुरुदेवप्रेमींनी गुरूमाऊलीला आदरांजली वाहताना एकापेक्षा एक सुमधुर सुहाय्य वंदनाने राष्ट्रसंतांची भजने सादर करण्यात आली. शंखाच्या ध्वनी नीनादनाने व राळ उदाच्या धुपाने वातावरनात वेगळेच चैतन्य निर्माण झाले होते.सामुदायिक ध्यानाच्या कार्यक्रमानंतर आश्रमाच्या महाद्वारावर नवी कोरी भगवी पताका अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवामण्डळच्या वतीने फडकविन्यात आली. भाविकांना गुरुतत्वाशी जोडण्यासाठी तसेच गुरूंना साक्षी ठेऊन सामाजिक धार्मिक व राष्ट्रीय हितासाठी प्रेरणा मिळावी या उद्देशाने अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवामण्डळच्यावतीने दरवर्षी गुरुपौर्णिमा महोत्सवाचे आयोजन गुरुकुंजात केले जाते.

पहाटे चार वाजता अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवामण्डळचे सर्वाधिकारी लक्ष्मण गमे यांच्या हस्ते पूजन करून सामुदायिक ध्यानाने या कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. यावेळी प्रचार प्रमुख प्रकाश वाघ यांनी सामुदायिक ध्यानावर चिंतन व्यक्त केले. दुपारी बारा वाजता ज्ञानेश्वरी दीदी यांचे गुरुमहिमा या विषयावर प्रवचन करण्यात आले. गुरुकुंजात दिवसभर सुरू असलेल्या कार्यक्रमात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज लिखित गुरुकृपा नहीं पड़ी सडक पर, यासह विविध लोकप्रिय खंजडी भजने सादर करण्यात आली. गुरुपौर्णिमा महोत्सवानिमित्त आज भाविकासाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली असून हजारो भाविकांनी यानिमित्त महाप्रसासाचा लाभघेतला. गुरुकुंजात दरवर्षी आयोजित करण्यात आलेल्या गुरुपौर्णिमा महोत्सवाची सांगता सामुदायिक प्रार्थनेने करण्यात आली गुरुपौर्णिमा महोत्सव आयोजन समिती प्रमुख यांनी अथक परिश्रम घेतले.

# धारणीत अध्यात्मिक सांस्कृतिक मेजवानीसह विठ्ठल दिंडी सोहळा



## एकादशीनिमित्त श्रीगुरुदेव प्रार्थना मंदिरावर सामुदायिक ध्यान प्रार्थना व भक्ती गीतांची बहारदार प्रस्तुती


**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११धारणी–** आषाढी एकादशीनिमित्त श्रीगुरुदेव सेवामंडळ धारणी, संताजी बहुउद्देशी शिक्षण संस्था व गुरुदेव संगीत विद्यामंदिर तलई कॅम्प धारणी यांच्या संयुक्त सहभागातून स्थानिक श्रीगुरुदेव प्रार्थना मंदिरावर आध्यात्मिक, सांस्कृतिक मेजवानीसह विठ्ठल दिंडी सोहळा संपन्न झाला. श्रीगुरुदेव प्रार्थना मंदिराचे विश्वस्त तथा सेवाधिकारी सुभाष येनोरकर यांच्या मार्गदर्शनात विठ्ठल भक्त व रसीक श्रोत्यांसाठी मंदिरावर सकाळपासूनच सामुदायिक ध्यान, प्रार्थना व भक्ती आराधनासह एकापेक्षा एक अश्या सुरेल बहारदार गीत प्रस्तुतीतून स्वर संध्या गाजली.

धर्माचार्य पंडित सूर्यप्रकाश मिश्रा यांच्या अध्यक्षतेखाली रात्री विठ्ठल स्तुतीसह व-हाडी नाट्यगीत, भावगीत, भक्तीगीत तसेच नवेदीत गीतकार मास्टर रोशन त्यांनीलिहिलेले विठ्ठल भक्ती- अभंग या अविस्मरणीय स्वर संध्या प्रस्तुतीचे आयोजन घेण्यात आले.

याप्रसंगी डॉ. ज्ञानेश्वर गोडे यांनी उपस्थितांपूढे पंढरीचा पांडुरंग व त्याचा अघाध महिमा व्याख्यान्यातून स्पष्ट केला. त्यापश्चात प्रार्थना मंदिरावर विठ्ठल रखुमाई मंदिर ट्रस्ट तर्फे दरवर्षीच घेण्यात येणारी विठ्ठल दिंडी पालखीच आगमन झाले त्यावेळी मंडळ विश्वस्त सुभाष येनोरकर हस्ते पालखीचे पूजन व त्यापश्चात दिंडी पालखी सोहळ्यात सहभागी झालेल्या विठ्ठल भक्तांना साबुदाणा खिचडी वितरण कार्यक्रम घेण्यात आला.दिंडी पालखी मिरवणूक सोहळ्याप्रसंगी मोठ्या प्रमाणावर वारकरी तथा विठ्ठल भक्तांसह श्रीगुरुदेव सेवा मंडळाचे सहकारी डॉ. ज्ञानेश्वर गोडे, व्यतिरिक्त विठ्ठल मंदिर ट्रस्ट संचालक तथा कार्याध्यक्ष गजानन पतंगे, प्रकाश झगेकर, राजू वाघमारे, अरुण गौर मनोज कस्तुरे, ज्ञानेश्वर उबाळे, तुकाराम कुटुंबे, अशोक वाघमारे, रवी चतुर, रमेश वाकोडे, रोशन बारवान, राजमुरारी मालवीय, योगेश शर्मा, संदीप माहूरकर, गणेशहॉलबिल, कुवरसिंग उईके, पुष्पा उमाळे, मंजू मोहोड, कमलाताई, सानपताई, आशा माहुलकर, रेखा उमाळे, योगीनीताई पतंगे, प्रमोद टोपे इत्यादींसह भक्ती स्वर संध्या प्रस्तुतीचे आयोजक मयूर येनोरकर, पवन येंनोरेकर, पंकज येणोरकर, प्रथमेश बडबाईक, धनश्री येणोरकर, मयुरी येनोरकर, प्रतिभा गिरी, गजेंद्र मावसकर तथा प्रार्थना मंदिर व श्रीगुरुदेव मंडळाचे सहकारी बांधव उपस्थित होते. महाआरतीपश्चात विठ्ठल भक्तांसाठी प्रसाद, फराळ, पाणी बॉटल वितरित कार्यक्रम घेण्यात आला.

# अमरावती, बडनेराचा पाणी पुरवठा उद्या बंद

**विदर्भ प्रजासत्ताकदि.११अमरावती**
महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत अमरावती व बडनेरा शहराला केला जाणारा पाणी पुरवठा शनिवार, १२ जुलै रोजी प्रभावित होणार आहे. पाणी पुरवठा योजनेच्या सिंभोरा हेडवर्क्स येथे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमार्फत १३२ केव्ही व ३३ केव्ही मोर्शी सबस्टेशन येथे देखभाल व दुरुस्तीचे काम नियोजित केले आहे. या कामामुळे सिंभोरा येथील विद्युत पुरवठा व पंपिंग बंद ठेवले जाईल. परिणामी १२ जुलै रोजी अमरावती व बडनेरा शहरातील नागपुरी गेट, सातुर्णा, साई नगर, राठी नगर, पार्वती नगर, म्हाडा कॉलनी, बडनेरा (नवी वस्ती), लालखेडी, मालटेकडी या ठिकाणच्या अप्पर



/लोअर टाकीवरून सकाळी ८ वाजतानंतर होणारा पाणी पुरवठा प्रभावित होईल. त्यामुळे नागरिकांनी आधीच पाण्याचा साठा करून ठेवावा व पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन मजीप्रामार्फत करण्यात आले.

# वृद्ध कलावंतांच्या मानधनाबाबत शासनाची उदासीनता

## आजवर केवळ दोनच हप्ते जमा, ५० कलावंतांवर निवडीअभावी अन्याय



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती–** कोरोना काळापासून पासून जिल्ह्यात वृद्ध कलावंत निवड समितीची बैठकच झाली नसल्याने सन २०२२ पासून जवळपास ७५० प्रस्ताव घुळखात पडले होते. अखेर ९ व १० डिसेंबर २०२४ रोजी निवड समितीची बैठक घेऊन, प्रलंबित प्रस्तावांमधून २०२२-२३ चे १०० प्रस्ताव आणि दरवर्षीचा इष्टांक १०० असतानासुद्धा २०२३-२४ मधील फक्त ५० प्रस्तावच जिल्ह्यातील सुमारे ५० कलावंतांवर निवडीअभावी घोर अन्याय झाल्याची माहिती समोर आली मंजूर केल्याने आहे.

शिवाय, निवड झालेल्या एकूण १५० कलावंतांना त्यांनी व तेही ज्यावर्षी प्रस्ताव दाखल केले. तेव्हापासून मासिक मानधन मिळणे अपेक्षित असताना आजवर केवळ दोनच महिन्यांचे अनियमितपणे मानधन डीबीटी प्रणालीद्वारे बँक खात्यात जमा झाले आहे. प्रलंबित सुमारे ७५० १५० प्रस्तावांपैकी केवळ कलावंतांचेच प्रस्ताव मंजूर झाल्याने ६०० प्रस्ताव संबंधित कलावंतांना परत करून त्यांना नव्याने ऑनलाइन पद्धतीने दाखल करण्याचे अर्ज करण्याचा मार्ग बंद झाला आहे. १६ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार, जूनमध्ये स्थानिक वर्तमानपत्रांतून जाहिरात प्रसिद्ध करून, जुलै महिन्यात अर्ज मागविण्याच्या प्रक्रियेला स्थानिक प्रशासनाने अद्यापही सुरुवात केली नसल्याने मनस्ताप सहन करावा लागत असून, शासनाची संबंधित वेबसाइट अजूनही बंदच असल्याने कलावंतांची दमछाक होत आहे. त्यामुळे एकूणच या निवड प्रक्रियेसंदर्भात प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

केवळ कलेवरच उपजीविका करणाऱ्या वृद्ध कलावंतांना पन्नाशीनंतर आर्थिक आधार मिळावा, यासाठी १९५३-५४ पासून शासनामार्फत राजर्षी शाहू महाराज वृद्ध कलावंत मानधन योजना सुरू करण्यात आली असून, यासंदर्भात शासनाच्या परिपत्रकात नमूद करण्यात आलेल्या लाभार्थी निवड वेळापत्रकाप्रमाणे व नियमावलीनुसार स्थानिक प्रशासनाने वृद्ध कलावंत मानधन निवड समितीच्या प्रक्रियेची योग्य प्रकारे अंमलबजावणी करून जिल्ह्यातील वृद्ध कलावंतांना योग्य न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी केली जात आहे.

# ‘इंडियन मिलन पार्टी ऑफ इंडिया’ या राजकीय पक्षाची मान्यता धोक्यात, निवडणूक आयोगाने बजावली नोटीस




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अकोला**

महाराष्ट्रात गेल्या काही वर्षांमध्ये वारंवार राजकीय भूकंपाचे धक्के बसले. सत्तांतरे घडली. फोडाफोडी व पळवापळवीच्या राजकारणात नीतिमत्ता, निष्ठा धुळीत मिळाली.राजकीय पक्ष, चिन्हांवर दावे-प्रतिदावे करण्यात आले. राजकीय पक्षांसाठीचे नेत्यांमधील लढे सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहोचले. त्यानंतर नव-नवे गट, पक्ष तयार झालेत. या सर्व पार्श्वभूमीवर आणखी एका राजकीय पक्षाची मान्यता धोक्यात आली आहे.निवडणूक आयोगाने या पक्षाला कारणे दाखवा नोटीस बजावली. पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना त्यांची बाजू मांडण्यासाठी निवडणूक आयोगाकडे सुनावणी होणार आहे.

गेल्या सहा वर्षांत एकाही निवडणुकीत सहभागी न झालेल्या नोंदणीकृत अमान्यता प्राप्त राजकीय पक्षांना भारत निवडणूक आयोगाच्या आदेशाने मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून नोटीसा बजावण्यात येत आहेत. त्याअंतर्गत ‘इंडियन मिलन पार्टी ऑफ इंडिया’ यांनाही ‘कारणे दाखवा’ नोटीस बजावण्यात आली आहे. देशातील राजकीय पक्षांची नोंदणी ही लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम २८ अ अंतर्गत केली जाते. त्या अंतर्गत नोंदणीकृत झालेल्या ‘इंडियन मिलन पार्टी ऑफ इंडिया’ने २०१९ पासून सहा वर्षांत एकाही निवडणुकीत सहभाग घेतला नाही. त्यामुळे भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशाने मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयातर्फे या पक्षाची नोंदणी रद्द का करू नये, यासाठी ‘कारणे दाखवा’ नोटीस बजावण्यात आली आहे.

# अखेर संततधार थांबली; तीन दिवसांत ११५ मिमी पाऊस

## तापमानात होणार ३, ४ अंशांनी वाढ; पुढील ४ ते ५ दिवस तुरळक पाऊस पडणार, हवामान विभागाचा अंदाज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती –**
यंदाच्या पावसाळ्यातील आतापर्यंतचा सर्वाधिक दमदार पाऊस जिल्ह्यात मागील तीन दिवसांत कोसळला आहे. ७, ८ आणि ९ जुलैला जिल्ह्यात ११५ मिमी पाऊस झाला आहे. या पावसामुळे पिकांना फायदा होण्यासोबतच जलस्रोतांचीही पातळी वाढण्यास मदत झाली आहे. दरम्यान तीन दिवसांनंतर गुरुवारी (दि. १०) पावसाने उसंत घेतली आहे. सूर्यदर्शन मात्र गुरुवारीही झाले नाही. दरम्यान आगामी चार ते पाच दिवस आता तुरळक ठिकाणी हलका व मध्यम पाऊस पडणार असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

हवामान विभागाने ७ ते ९ जुलैदरम्यान जिल्ह्यात मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला होता. त्यानुसार या तीन दिवसांत काही महसूल मंडळात मुसळधार पाऊस झाला. तसेच इतरही भागात समाधानकारक पावसाने हजेरी लावली. त्यामुळे खरिपातील पिकांना याचा आधार झाला.

रविवारी मध्यरात्रीपासून पावसाला सुरुवात झाली



तेव्हापासून तर बुधवारपर्यंत सततच्या पावसामुळे शेतातील पिकांना पाण्याचा मोठा प्रमाणात फटका बसला असून, शेतकऱ्यांच्या शेतात अक्षरशः जलाशयाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होताना दिसत आहे. जूनमध्ये पावसाने खंड दिला. तेव्हापासून जुलैत पहिल्या आठवड्यापर्यंत पावसाची हजेरी नव्हती. मात्र, रविवारपासून सुरू असलेल्या संततधारेमुळे जीवनमान विस्कळीत झाले आहे. मुसळधार पाऊस नसून हलका ते मध्यम पाऊस आहे. हा पाऊस पिकांसाठी पोषक मानला जात असला तरीही शेतामध्ये मोठ्या प्रमाणात पाणीच पाणी दिसत आहे. त्यामुळे पिके सडतात की, काय याची शेतकऱ्यांना चिंता लागली आहे. मागील तीन दिवसात जिल्ह्यात समाधानकारक पाऊस झाला आहे. मात्र १ जून ते १० जुलैपर्यंतची सरासरी लक्षात घेता २३१ मिमी पाऊस अपेक्षित होता. प्रत्यक्षात २२० मिमीच पाऊस झाला आहे.

# पी. आर. पोटे पाटील कॉलेजमध्ये गुरुपौर्णिमा उत्साहात

## श्री संत गजानन महाराजांची सामूहिक आरती




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ अमरावती** – पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड मॅनेजमेंट, अमरावती येथे गुरुपौर्णिमा सण भक्तिभावाने साजरा करण्यात आला. पारंपरिक अध्यात्मिकतेने महाविद्यालयाचा संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारलेला होता.कार्यक्रमाची सुरुवात संत गजानन महाराजांची पूजा करून आरतीने झाली. विद्यार्थ्यांनी आणि प्राध्यापकांनी सामूहिक आरतीत सहभाग घेत संतांच्या चरणी नतमस्तक होत आशीर्वाद घेतला.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एम. जावांधिया सर व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा विद्यार्थ्यांनी सन्मान केला. विद्यार्थ्यांनी आपले भविष्य घडवणाऱ्या गुरुंसाठी कृतज्ञता व्यक्त केली.कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी भक्तिमय भजने सादर केली. विद्यार्थिनींनी गुरुपौर्णिमेच्या महत्त्वावर केलेल्या भाषणांनी उपस्थितांची मने जिंकली.प्राचार्य डॉ. जावांधिया यांनी मार्गदर्शन करत सांगितले, गुरु केवळ ज्ञान देत नाही तर शिष्याचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व घडवतो. आपल्या संस्कृतीत गुरुंना वंदन करणे ही परंपरा आहे आणि ती जपणे ही आपली जबाबदारी आहे.या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक क्लब केले होते. शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे कार्यक्रम यशस्वी ठरला.–

# १५० किलो प्लास्टिक बॅग जप्त; दुकानही सील




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती–**
शहरात प्लास्टिक बंदीच्या अंमलबजावणीत महापालिकेने मोठी कारवाई करत कडक संदेश दिला आहे. उपायुक्त डॉ. मेघना वासनकर यांच्या मार्गदर्शनात अतिक्रमण विभाग व बाजार परवाना विभागाच्या विशेष पथकाने सक्करसाथ येथील शनी मंदिराजवळील जय ट्रेडर्स या दुकानावर धाड टाकून १५० किलो प्रतिबंधित प्लास्टिक कॅरीबॅग जप्त केल्या. कारवाई दरम्यान संबंधित दुकान सील करण्यात आले.

या धाडीत सहायक आयुक्त नंदकिशोर तिखिले, भूषण पुसतकर, अतिक्रमण पथक प्रमुख योगेश कोल्हे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी प्रशांत मेहरे, स्वच्छता निरीक्षक विकी जेधे, पोलिस अधिकारी व इतर कर्मचारी सहभागी होते. राज्य शासनाने लागू केलेल्या प्लास्टिक बंदीचे उल्लंघन केल्यास कठोर कारवाई होणारच आहे. पर्यावरणाच्या रक्षणासाठी ही बंदी अत्यंत आवश्यक असून, नियमांचे पालन करणे सर्व नागरिकांचे कर्तव्य आहे, असे मनपाच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.प्लास्टिक बंदी केवळ व्यापाऱ्यांसाठीच नव्हे, तर प्रत्येक नागरिकासाठी आहे. अमरावती शहराचे पर्यावरण व भविष्यासाठी आपण सर्वांनी एकत्र यावे, प्लास्टिक ऐवजी कापडी, कागदी पिशव्यांचा वापर करावा, असा संदेश याप्रसंगी मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांनी दिला. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांची माहिती तत्काळ प्रशासनाला द्यावी.

# जिल्हा परिषद पं. स. करिता १४ जुलै रोजी प्रभाग रचना होणार जाहीर

## २१ जुलैपर्यंत आक्षेप व हरकती स्वीकारणार ८ ऑगस्ट रोजी अंतिम प्रभाग रचनेची प्रसिध्दी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकांच्या प्रक्रियेला अखेर न्यायालयाच्या आदेशावरून गती मिळाली आहे. शासनाने यासंबंधीचा आदेश जारी करीत संभ्रमाला पूर्णविराम दिला. विशेष म्हणजे, २०१७ साली निश्चित करण्यात आलेल्या प्रभाग रचनेनुसारच यंदाच्या निवडणुका घेण्यात येणार आहेत. त्यामुळे झेडपीचे ५९ सर्कल आणि पंचायत समितीचे ११८ गण कायम राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. याकरिता येत्या १४ जुलै रोजी प्रभाग रचनेची अधिसूचनाप्रसिध्दी केली जाईल.




जिल्हा परिषदेसह १४ पंचायत समित्यांमध्ये सध्या प्रशासक आहे. गत साडेतीन वर्षांपासून या स्थानिक स्वराज्य संस्थानच्या निवडणुकीच्या प्रतीक्षेत राजकीय पदाधिकारी होते. सदर प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असताना में महिन्यात न्यायालयाने सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार महिन्यांच्या आता लावण्याचे आदेश दिले आणि शासन कामाला लागले. शासनाने २०१७ मधील प्रभागरचना कायम ठेवत निवडणूक कार्यक्रमास मंजुरी दिली आहे.२१ जुलैपर्यंत आक्षेप व हरतकी प्रसिध्द करुन वावर स्विकारल्या जाणार आहे. त्यानंतर २८ ऑगस्ट रोजी अंतिम प्रभागरचनेची या निर्णयानंतर प्रशासनाने निवडणूक पूर्व कामकाज सुरू केले असून १४ जुलैपासून ते १८ ऑगस्टदरम्यान प्रभाग रचना कार्यक्रम राचविण्यात येणार आहे. या कालावधीत जनतेकडून सूचना, हरकती स्वीकारल्या जातील आणि त्यावर सुनावणी होणार आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे.

### असा आहे कार्यक्रम

१४ जुलै रोजी प्रभाग रचनेची अधिसूचना जाहीर होईल. २१ जुलै रोजी जिल्हाधिकारी यांच्याकडे हरकती व सूचना सादर करणे, २७ जुलै रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातून हरकतीच्या आधारावर अभिप्राय सादर करणार आहे. ११ ऑगस्ट रोजी प्राप्त अभिप्राय वाहरकतींवर सुनावणी, २८ ऑगस्ट रोजी अंतिम प्रभागरचना मान्यतेसाठी आयोगाकडे सादर केली जाणार आहे.

# नांदगाव तालुक्यात सततच्या भारनियमनाने नागरिक त्रस्त

## महावितरणविरोधात नागरिकांमध्ये रोष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११नांदगाव खंडेश्वर**

तालुक्यातील नागरिक सध्या विजेच्या गंभीर समस्येला तोंड देत आहेत. एकीकडे अविरत भारनियमनाने जनजीवन विस्कळीत झाले असून दुसरीकडे वीज बिल मात्र अव्वाच्या सव्वा आकारले जात आहे. या दुहेरी कोंडीतून नागरिक त्रस्त झाले असून, महावितरणच्या कारभाराबद्दल संताप व्यक्त होत आहे.

तालुक्यात दररोज वेळी-अवेळी वीजपुरवठा खंडित होतो. अनेकदा दिवसा तर कधी रात्रीच्या वेळेसही वीज नसल्याने घरगुती कामे, शेती पंप, लहान उद्योगधंदे आणि विद्यार्थ्यांचा अभ्यास यावर परिणाम होत आहे. महावितरणने भारनियमनाचे कुठलेही वेळापत्रक जाहीर केलेले नसल्याने नागरिक संभ्रमात आहेत.भारनियमनामुळे नागरिकांचे हाल होत असताना दुसरीकडे महावितरण कोणतीही तडजोड न करता वीज बिल वसुलीत गती दाखवत आहे. निर्धारित वेळेत बिल न भरल्यास तातडीने कनेक्शन कट करण्याची



कारवाई केली जाते. मात्र, नागरिकांचे प्रश्नआणि त्रास याकडे दुर्लक्ष केले जाते. नांदगाव विद्युत विभागातील अधिकारी विशेषतः शहर अभियंता यांच्यावर नागरिकांनी बेजबाबदारपणाचा आरोप केचा आहे. हे अधिकारी दररोज अमरावतीवरून अपडाऊन करतात. मात्र, तालुक्याच्या विजेच्या प्रश्नाबाबत कोणताही ठोस उपाययोजना करीत नाहीत. नागरिकांच्या तक्रारींना उत्तर देण्याचेही भान त्यांच्याकडे नाही, असा आरोप होत आहे. वेणस व नांदसावंगी येथील मंजूर झालेल्या ३३ केव्ही सबस्टेशनच्या कामाला अद्यापही सुरुवातच करण्यात आलेली नाही. यासाठी महावितरणच्या अधिका-यांनी कोणताही पाठपुरावा केलेला नाही. या कामातदेखील स्थानिक अधिकाऱ्यांची उदासीनता दिसून येते.

# कृषिभवनाचे भाडे ११ हजार पावती मात्र दोन हजारांची

## दर्यापूर बाजार समितीमधील प्रकार सहाय्यक निबंधकांकडे तक्रार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११भामोद**

दर्यापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कृषीभवनाचे भाडे ११ हजार रुपये असल्याचे सांगून कार्यक्रम आयोजकांना मात्र केवळ दोन हजारांची पावती दिली जात आहे. याबाबत तक्रारकर्ते यांनी सहाय्यक निबंधकांकडे तक्रार दाखल करुन कारवाईची मागणी केली आहे.




दर्यापूर तालुक्यातील भामोद येथील शेतकरी तथा आरपीआय आठवले गटाचे अध्यक्ष हरिदास खडे यांच्याकडे २१ जून रोजी कौटुंबिक कार्यक्रम होता. दर्यापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे कृषी भवन त्याकरिता त्यांनी भाड्याने घेतले होते. भाड्याची रक्कम ११ हजार इतकी ठरली होती. त्यानुसार अर्जदाराने कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संबंधित कर्मचाऱ्याकडे पैशाचा भरणा केला, मात्र सदर केल्याने ११ हजारांची पावती नता केवळ २ हजारांची पावती दिली. याबद्दल सदर कर्मचाऱ्याला विचारले असता त्याने कोणते समाधानकारक उत्तर दिले नाही. त्यामुळे ९ हजार रुपये कशात दाखविले. अशी शंका तक्रार कर्त्यांनी व्यक्त केली आहे.याबाबत बाजार समितीचे विद्यमान सचिवाकडे विचारणा केर मात्र त्याबद्दल कुठलाही समाधानकारक खुलासा संबंधितांकडून मिळाला नाही. त्यामुळे सदर प्रकरणाची चौकशी व्हावी याकरिता सहाय्यक निबंधक सहकारी संस्था दर्यापूर यांच्याकडे हरीदास खड़े यांनी केली असून प्रकरणाची सखोल चौकशीची मागणी केली आहे. दर्यापूर येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कृषीभवनाची अन्य कार्यक्रमाकरिता मोठ्या प्रमाणात मागणी आहे. परंतु येथे ११ हजारांऐवजी २ हजारांची पावती देऊन चक्क ९ हजारांचा गोडबंगाल केल्या जात असल्याचा आरोप खडे यांनी तक्रारीतून केला आहे.

> दोन हजार रुपये ॲडव्हास म्हणून त्यांनी भरले होते ती त्याची पावती आहे. इतर रक्कमेची पावती त्यांना त्या दिवशी कर्मचाऱ्याने दिली नसेल परंतु आमच्याकडे ती तयार आहे. त्यांना गैरसमज झाला असेल त्यांची नऊ हजारांची पावती आमच्याकडून घेऊन जावी,
>
> **हिम्मत मातकर, सचिव, बाजार समि दर्यापूर.**

# तळवेल-जवळा रस्ता झाला चिखलमय : वाहतूक ठप्प नागरिक त्रस्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११टाकरखेडा संभू**

चांदूरबाजार तालुक्यातील तळवेल ते जवळा जिल्हा परिषद शाळेच्या पूर्वेकडील रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाली आहे. त्यामुळे नागरिकांचे हाल सुरू आहेत. सततच्या पावसामुळे रस्त्यावर चिखल साचल्यामुळे वाहनचालकांसह नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.



सदर रस्त्यावरून कोणतेही वाहन चालविणे कठीण झाले आहे. नागरिकांना पायदळ येणे-जाणेदेखील अशक्य झाले आहे. या परिस्थितीमुळे या रस्त्यावरून दळणवळण पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. गावातील शाळेच्या दिशेने जाणारा रस्तादेखील चिखलाने भरलेला असून, विद्यार्थ्यांना शाळेत पोहोचणे कठीण झाले आहे. काही ठिकाणी तर पाय घसरून अपघात होण्याची शक्यता असल्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरणआहे. या दोन दिवसात नागरिक चिखलात पाय घसरून पडलेले आहेत. या रस्त्याबाबत तक्रारी करूनही अद्याप कोणत्याही प्रशासकीय यंत्रणेकडून त्याकडे लक्ष दिले गेले नाही. नागरिकांनी रस्त्याच्या तातडीच्या दुरुस्तीसाठी प्रशासनाकडे वारंवार मागणी केली आहे.

# बनोसा येथील ऑक्सिजन पार्क बनलाय डुकरांचा अड्डा दर्यापूर नगरपरिषद कुंभकर्णी झोपेत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११दर्यापूर**

दर्यापूर नगर परिषद हद्दीमध्ये बनोसा भागामध्ये शनी मंदिर च्या बाजूला स्थानिक लोकांनी पुढाकार घेऊन त्या ठिकाणी दर्यापूर नगर परिषदेच्या सहकार्यानेऑक्सिजन पार्क भाग्योदय मंगल कार्यालय समोर व शनी मंदिर च्या बाजूला गार्डन बनवण्यात आले त्यामध्ये विविध प्रकारची वृक्ष लागवड करण्यात आली निवड लागवड नाही तर तिचे संगोपन



सुद्धा करणे सुरू आहे त्याच भागातील नागरिकांमुळे ते गार्डन आज चांगल्या स्थितीत कार्यरत आहेत मात्र आता त्या गार्डन ऑक्सिजन पार्क ला डुकरांचे ग्रहण लागले असून ३० ते ४० डुकरांचा कळप एकत्रित येऊन त्या ऑक्सिजन पार्क मध्ये घाण करत आहेत व ते घाण करता करता झाडांचे नुकसान करीत सुद्धा आहेत नगरपरिषद दर्यापूरणे त्या बाबीकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे नाहीतर ते ऑक्सिजन पार्क नावालाच पुरेल आणि पहिल्यासारखाच खाजगी अड्डा त्या जागेमध्ये तयार केला जाईल याची जाण नगरपरिषद ने असू द्यावी अशी मागणी त्याच परिसरातील वेगवेगळ्या सामाजिक कार्यकर्त्यांनी एका पत्रकाद्वारे केली आहे हा ऑक्सिजन पार्क म्हणून त्याकरिता त्याच भागातील प्रमोद पाटील रेखे, श्री साबळे, श्री पाचकवळे, विक्रांत पाटील ठाकरे, विकी पाटील खारोडे, यांनी तयार केलेले गार्डन फुलायला लागलं मात्र आता या डुकराचा बंदोबस्त करणे ही नगरपरिषद ची जबाबदारी आहे.मात्र नगरपरिषद याकडे दुर्लक्ष करीत आहे.

# पांदण रस्त्यासाठी शेतकऱ्यांचे रास्ता रोको आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११दर्यापूर**

सामदा गावातून ते नांदरुण शेत रस्त्याची अवस्था दयनीय असल्यामुळे मोठया प्रमाणावर शेतकऱ्यांना नाहक त्रास होत आहे. या रस्त्यावर खूप मोठया प्रमाणात दुतर्फा गवत, बंगाली काटे, झाडे-झुडपे वाढली आहेत. त्यामुळे हा रस्ता बांधून द्यावा, यासाठी शेतकऱ्यांनी जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाला अनेकदा निवेदने दिली; मात्र समस्या मार्गी न लागल्याने संतप्त शेतकऱ्यांनी बुधवारी सामदा-दहिहांडा या प्रमुख रस्त्यावर तासभर रास्तारोको आंदोलन केले.



सामदा ते नांदरुण या चार किलोमीटर पांदण रस्त्याची दयनीय अवस्था झाली आहे. त्यामुळे शेतकरी व मजूर वर्गाला शेतापर्यंत जाणे म्हणजे एक मोठे आव्हान झाले आहे. वन्य प्राण्यांमुळे शेतकऱ्यांना रात्री-अपरात्री शेतात जावे लागते. त्यामुळे वैथील रस्त्याचे बांधकाम होणे आवश्यक आहे. त्यासाठी शेतकऱ्यांनी रास्तारोको केला. यावेळी दोन्ही बाजूंनी वाहतूक खोळंबली होती. दरम्यान जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे उम अभियंता अखिलेश झंजाल है घटनास्थळी पोहोचले व त्यांनी वातडीने मुरुम टाकण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. या आंदोलनात बळीराम भगत, नागोराव किरडे, प्रभाकर चौरपगार, संतोष भोंडे, प्रल्हाद कळसकर, दिनकर घुगरे, दिनकर उकर्डे, केशव पळसपगार, विष्णू कोलटके, राम भगत, निवृत्ती कोलटके, सुरेश पहातोंडे, जगनाय भगत, हिंमत भगत, संजय चावरे, रामकृष्ण भगत आदी शेतकरी सहभागी झाले होते.

# अमरावतीकरांनो सावधान.... आठवडाभरात डेंग्यू व चिकनगुनियाचे १५ रुग्ण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

पावसाळ्याचे दिवस असल्याने डास उत्पत्ती वाढून डेंग्यू व चिकनगुनियासारख्या आजारांचीही साथ पसरते. गत आठवडाभरातच जिल्हाभरात आठ डेंग्यू, तर सात चिकनगुनियाचे अशाप्रकारे १५ रूग्ण आढळून आले आहे. साचलेल्या पाण्यात एडीस डासांची उत्पत्ती होऊन त्याच्यामुळे डेंग्यू पसरतो. त्यामुळे घरात किंवा घराच्या परिसरात साचलेल्या पाण्यात डास,




अळ्या तयार होत असल्यास तातडीने ते पाणी फेकून देण्याचे आवाहन येत आहे. जानेवारी ते जुलै या सात महिन्यांच्या काळात ६६१ रूग्णांचे रक्तनमुने तपासण्यात आले. त्यापैकी ५२ रूग्णांना डेंग्यूची, तर ४३ रूग्णांना चिकनगुनियाची लागण झाल्याचे आढळून आले. यामध्ये ग्रामीण व महापालिका क्षेत्रातील दोन्ही रूग्णांचा समावेश आहे.त्यातही जुलै महिन्यात केवळ आठवडाभरातच ग्रामीण भागात ३४ रुग्णाचे रक्तनमुने तपासण्यात आले. त्यापैकी चार डेंग्यूचे, तर तीन चिकनगुनियाचे रूग्ण होते. तसेच महापालिका क्षेत्रात ९ रूग्णांपैकी चार डेंग्यूचे, तर चार चिकनगुनियाचे रूग्ण होते. दरम्यान, बाधित रूग्णांवर उपचार झाले असून, ते बरे झाले आहेत; मात्र तरीही नागरिकांनी घराच्या परिसरात पाणी साचू देऊ नये, असे आवाहन जिल्हा हिवताप कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

# महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटनेची राज्यस्तरीय सभा शिर्डीत : सर्व सदस्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

१३ जुलै २०२५ रविवार रोजी सप्तपदी मंगल कार्यालय साईनगरी शिर्डी येथे सकाळी ११ वाजता महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटना मुंबई -३२ची राज्यस्तरीय सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली आहे. या महत्वपूर्ण सभेस राज्यातील सर्व दिव्यांग कर्मचारी व अधिकाऱ्यांनी मतभेद विसरून मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संघटनेचे प्रमुख पदाधिकारी दिगंबर घाडगे पाटील, परमेश्वर बाबर साहेब, रवींद्र पाटील आणि साईनाथ पवार यांनी केले आहे.दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या



हक्कांसाठी संघटना सातत्याने संघर्ष करत असून, अनेक प्रलंबित प्रश्नांबाबत शासन स्तरावर प्रभावी पाठपुरावा केला जात आहे. विशेष वाहतूक भत्ता, पदोन्नती, सहाय्यक तंत्रज्ञान साधने आणि शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ सर्व दिव्यांग कर्मचाऱ्यांना मिळावा यासाठी संघटना ठोस प्रयत्न करत आहे.संघटनेच्या माध्यमातून महाराष्ट्रातले सर्व जिल्हावार ऑनलाईन सभा घेण्यात येत असून, त्या सभांना मोठ्या प्रमाणात संघटनेचे सर्व सदस्यांचा प्रतिसाद मिळत आहे. या उपक्रमामुळे दिव्यांग कर्मचाऱ्यांमध्ये एकजूट निर्माण झाली असून, संघटनेने याबद्दल समाधान व्यक्त केले आहे.या ऑनलाईन व प्रत्यक्ष सभांना मार्गदर्शन करण्यासाठी दिगंबर घाडगे पाटील, परमेश्वर बाबर, रवींद्र पाटील, साईनाथ पवार तसेच हणमंतराव अवघडे हे पदाधिकारी सदैव पुढे आहेत.दिव्यांग कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी हा महत्वपूर्ण टप्पा असून, शिर्डी येथील सर्वसाधारण सभेला उपस्थित राहून संघटनेच्या संघर्षात सहभागी होण्याचे आवाहन दिगंबर घाडगे पाटील, परमेश्वर बाबर साहेब ,रवींद्र पाटील , साईनाथ पवार यांनी केले आहे. अशा प्रकारची माहिती अमरावती जिल्हाध्यक्ष राजेंद्र दिक्षित व जिल्हा सचिव किशोर मालोकार यांनी दिली आहे.

# पालकांना जिवे मारण्याची धमकी; मुख्याध्यापकाला कारणे दाखवा नोटीस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ चिखलदरा**

शाळेत नियमित येत नसल्याची तक्रार करणाऱ्या पालकांना नगरपरिषदेच्या शाळेत कार्यरत मुख्याध्यापकाने जिवे मारण्याची धमकी दिली होती. या प्रकरणी चिखलदरा नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांनी मुख्शाध्यापकांना कारणे दाखवा नोटीस बजाविली आहे.

चिखलदरा येथील नगर परिषद उच्च प्राथमिक शाळा क्र. २, येथे कार्यरत असलेल्या मुख्याध्यापक जहीर खान यांच्यावर गैरहजर व अयोग्य वर्तन करित असल्याचा आरोप आहे. त्यांच्या चखर पोलीस ठाण्यात तक्रार देखील दाखल करण्यात आली आहे. त्यांच्यावर शाळेच्या वेळेत गैरहजर राहणे, मोबाईलवर अपशब्द वापरणे आणि जीवे मारण्याची धमकी देणे असे गंभीर आरोप ठेवण्यात आले आहेत.७ जुलै २०२५ रोजी नगरपरिषद मुख्याधिकारी विजय लोहकरे यांनी दिलेल्या मौखिक आदेशाच्या आधारे त्या मुख्याध्यापकांना कारणे दाखवा नोटीस बजावली असून, हा प्रकार मुख्याध्यापक पदाच्या शिस्ती व प्रतिष्ठेला बाधाआणणारा आहे, असे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यांचे हे वर्तन महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९७९ मधील नियम ३ च्या विरोधात आहे, असे नोटीसमध्ये म्हटले आहे.मुख्याध्यापकाने ७ दिवसांच्या आत या प्रकरणात आपले लिखित स्पष्टीकरण सादर करावे, अन्यथा त्यांच्या विरुद्ध एकतर्फी शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असे निर्देश नोटीसव्दारे देण्यात आले आहे. या घटनेमुळे संपूर्ण शिक्षण विभागात खळबळ उडाली असून, स्थानिक स्तरावरही ही घटना चर्चेचा विषय ठरली आहे.

# अमरावती - नरखेड रेल्वे लाईन करिता भूसंपादन केलेल्या मनपा मालकीच्या संबंधित अभिन्यासामधील विकास कामे करा

## माजी महापौर चेतन गावंडे यांचे मनपा आयुक्तांना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

अमरावती नरखेड रेल्वे लाईन करिता मौजे अकोली येथील मनपाच्या मालकीच्या भूखंडाचे भूसंपादन रेल्वे विभागाकडून करण्यात आले होते मात्र भूसंपादित करण्यात आलेल्या भूखंडाचा मोबदला रेल्वे विभागाकडून अप्राप्त असल्यामुळे सदर भूखंडाच्या अभिन्यासामधील विकास कामे अजून पर्यंत करण्यात आली नाही . करिता भूसंपादित केलेल्या भूखंडाचा मोबदला रेल्वे विभागाकडून प्राप्त करून संबंधित अभिन्यासामधील विकास कामे तत्काळ करावे. अशी मागणी माझी महापौर चेतन गावंडे यांनी मनपा आयुक्तांना निवेदनाद्वारे केली आहे. अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील साईनगर प्रभाग १९ अंतर्गत येणाऱ्या मौजे अकोली



सर्वे क्रमांक ३/२ व १६ एकूण क्षेत्रफळ ६४८ चौ . मी , सर्वे क्रमांक २७/१ एकूण क्षेत्रफळ १८० चौ . मी . , सर्वे क्रमांक ३१/३ एकूण क्षेत्रफळ १२९६ चौ. मी . विशेष भूसंपादन अधिकारी लघु सिंचन कामे अमरावती यांच्याकडून भूसंपादन करण्यात आले होते. या भूखंडाचा मोबदला मिळण्याबाबत अनेक पत्र व्यवहार झाला, परंतु अजून पर्यंत भूसंपादित भूखंडाचा मोबदला महानगरपालिकेला मिळाला नाही . वरील भूखंड महानगरपालिकेत अभिनयासामधील विकास खर्चापोटी मिळाले होते .सदर भूखंडाचा मोबदला मिळाल्यास अभिन्यासामधील विकास विकास कामे करणे शक्य होईल. करिता लवकरात लवकर मोबदला मिळण्याबाबत कारवाई करण्याची मागणी माझी महापौर चेतन गावंडे यांनी निवेदनातून केली आहे.

# शासकीय योजना, सातबाऱ्यावर पत्नीचे नाव नोंदवा शून्य खर्चात

## महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी एक पाऊल : शासनाची योजना

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

ग्रामीण भागातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी आणि शेतमालकीत थेट सहभाग मिळावा, यासाठी महाराष्ट्र शासनाने 'लक्ष्मी मुक्ती' ही योजना सुरू केली आहे. या योजनेचे उद्दिष्ट म्हणजे महिलांना शेतीमालमत्तेवर थेट हक्क प्रदान करणे. योजनेंतर्गत, पती आपल्या नावावरील ७/१२ उताऱ्यावर पत्नीचे नाव सहहक्कदार म्हणून अधिकृतपणे नोंदवू शकतो. या उपक्रमामुळे महिलांना केवळ मालकीचा अधिकारच मिळणार नाही, तर त्यांना आर्थिक निर्णय प्रक्रियेतही सहभागी होता येणार आहे.अर्ज करण्यासाठी अर्जदारांना आपल्या गावातील तलाठी कार्यालयात थेट संपर्क साधावा लागेल. तलाठ्यांकडे पत्नीचे नाव सहहिस्सेदार म्हणून ७/१२ उताऱ्यावर नोंदणीसाठी अर्ज सादर करावा लागणार आहे. ही प्रक्रिया स्थानिक स्तरावर सहज आणि पारदर्शकपणे पूर्ण केली जाते.




### लागणार ना नोंदणी शुल्क, ना मुद्रांक शुल्क

लक्ष्मी मुक्ती योजनेंतर्गत पत्नीचे नाव ७/१२ उताऱ्यावर सहहिस्सेदार म्हणून नोंदवण्यासाठी कोणतीही नोंदणी फी, शासकीय शुल्क किंवा मुद्रांक शुल्क आकारले जात नाही. ही प्रक्रिया पूर्णपणे विनामूल्य असून, लाभार्थ्यांनी कोणत्याही दलालांच्या किंवा अनधिकृत व्यक्तींच्या भूलथापांना बळी पडू नये, असे स्पष्ट निर्देश शासनाने दिले आहेत. यामुळे आता नागरिकांची होणारी अडचण थांबणार आहे.

### बचत गटातून कर्ज पुरवठा करता येणार !

लक्ष्मी मुक्ती योजनेंतर्गत महिलांना शेतीमालकीत हक्क मिळाल्यानंतर, बचत गटांच्या माध्यमातून त्यांना कर्जपुरवठा करता येणार आहे. या योजनेमुळे महिलांना शेतीसंबंधित आर्थिक मदत सहज मिळवता येईल, ज्यामुळे त्यांचा शेती व्यवसाय अधिक सक्षम आणि स्वावलंबी होण्यास या योजनेमुळे मदत होणार आहे.

### कोणकोणती कागदपत्रे जोडावी लागणार ?

अर्जासोबत काही आवश्यक कागदपत्रे जोडावी लागतात. यात विवाह प्रमाणपत्र (लग्न नोंद), ७/१२ उताऱ्याची सध्याची प्रत आणि आधारकार्ड किंवा अन्य ओळखपत्र यांचा समावेश होतो. ही कागदपत्रे अर्जाच्या प्रक्रियेला योग्य प्रकारे समर्थित करतात आणि नोंदणीसाठी आवश्यक आहेत.

# पालेभाज्या गायब, फळभाज्या महाग : संततधार पावसामुळे आवक घटली

## उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान; ग्राहकांनाही दरवाढीचा फटका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

दरवर्षी पावसाळ्यात हिरव्यापालेभाज्यांची आवक घटली की बाजारात फळभाज्या महाग होतात. यंदा शहरातील आठवडी बाजारातून पालेभाज्या गायब झाल्या असून, आहे हिरवी मिरची गगनाला भिडली फळभाज्यांच्या किमतीत वाढ झाली आहे. हिरवी मिरची व लसूण सध्या २०० रुपये किलोने बाजारात विकले जात आहे तर गवार शेंगा, शिमला मिरची,



चवळी व शेवगाच्या शेंगांना प्रतिकिलोमागे १०० रुपयांवर किंमत मोजावी लागत आहे.

आठवड्यातील भाजीपाला खरेदीचा खर्च वाढलेला दिसून येत आहे. यामुळे सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री बसत आहे. पावसाळ्याच्या दिवसात महाग झालेला भाजीपाला खरेदी केल्यानंतर इतर खर्चाचे बजेट बिघडत आहे. वांगी, टोमॅटो, भेंडी, कारली या भाज्यांचे दर आठवड्यातच दुपटीने वाढले.

**पावसामुळे दरवाढ**

मागील आठवड्यापासून संततधार पाऊस येत असल्याने भाजीपाला पिकांना मोठा फटका बसलेला आहे. पावसामुळे बाजारात भाजीपाल्याची आवक घटली असून, विविध प्रकारच्या काही फळभाज्या दुपटीने महागल्या.

**शेतकऱ्यांना अल्प नफा**

पावसाळ्यात मेथी, पालक, कोथिंबीर, भेंडी, कारले, दोडका, चवळी, वांगी आदी भाजीपाला सडतो. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होऊन त्यांनाही अल्प नफा मिळत आहे.

# केवायसी केली का? नाव जाणार 'बोगस' रेशनकार्डाच्या यादीत

## शासनाची मोहीम : वारंवार मुदतवाढ देऊनही प्रक्रियेला संथगती; धान्य वितरण बंद होण्याचा धोका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

वारंवार आवाहन करूनही अद्याप ई-केवायसी पूर्ण न केलेल्या कार्डधारकांना आवश्यक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठीची अंतिम मुदतही संपुष्टात येत आहे. जिल्ह्यात अनेक नागरिकांची केवायसी बाकी आहे. यासाठी स्थानिक रेशन दुकानदारांकडून नागरिकांना आवाहन केले जात आहे. जे नागरिक केवायसी करणार नाहीत त्यांचे नाव बोगस रेशनकार्डधारकांच्या यादीत जाण्याची शक्यता आहे.रेशन दुकानांमधून सध्या मोफत धान्याचे वितरण केले जात आहे. यामुळे धान्याची उचल करणाऱ्या लाभार्थ्यांची



संख्या वाढली आहे. यातील खरे लाभार्थी शोधण्यासाठी ई-केवायसी प्रक्रिया केली जात आहे. ही प्रक्रिया न करणाऱ्या लाभार्थ्यांना पुढील काळात धान्याला मुकावे लागणार आहे. ११ जुलैपर्यंत ई-केवायसी करण्याच्या सूचना आहेत.

**ई-केवायसीकरिता कुठली कागदपत्रे हवी?**

आधारकार्ड, रेशनकार्ड या दोन बाबी असतील तर ई-केवायसीची प्रक्रिया गाव पातळीवरच पूर्ण करता येते. हे कागदपत्र गावातील रास्त दुकानदाराकडे सादर करायचे आहे. यावर दुकानदार नोंद करणार आहेत. ही प्रक्रिया पार पाडताना कार्डवरील सर्व लाभार्थ्यांना आधारकार्डसह हाताचे ठसे द्यावे लागणार आहेत.

# महावितरणच्या बैठकीत किशोर बोरकर यांनी अधिकाऱ्यांना धरले धारेवर

## ग्राहकांचा विद्युत पुरवठा खंडित होणार नाही, यासाठी महावितरणने आधुनिक, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

प्रत्येक केंद्रावर ग्राहकांच्या तक्रारींची दखल घेऊन खंडित झालेला विद्युत पुरवठा लवकरात लवकर सुरू करण्यासाठी, केंद्रावरील विद्युत ग्राहकांच्या संख्येच्या प्रमाणात किती कर्मचारी वर्ग असला पाहिजे, त्यानुसार आहे का? नसेल तर का नाही? वादळ वारा पाऊस या कारणांमुळे विद्युत पुरवठा खंडित होतो, हे समजुन घेण्यासारखे आहे. परंतु वादळ, वारा पाऊस नसतांना सहा ते आठ तास कधी तर रात्रभर विद्युत पुरवठा खंडित असतो, फोन उचलत नाहीत, ही



तक्रार तर कायमचीच आहे. असा सवाल महावितरणच्या अधिकाऱ्यांना बैठकीत किशोर बोरकर यांनी केला,

अमरावती शहरात गेल्या सहा महिन्यांपासून अमरावती शहरातील बहुतेक सर्वच भागात अचानक पणे वादळ, वारा पाऊस नसतांना विद्युत पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढलेले आहे. श्यामनगर,वडाळी, काँग्रेस नगर, फ्रेजरपुरा, संजय गांधी नगर, वडरपुरा, चपराशीपुरा, राहुल नगर, याभागात वेळी, अवेळी अचानकपणे विद्युत पुरवठा गेल्या सहा महिन्यांपासून सतत खंडीत होत आहे. व यामुळे नागरिकांच्या दैनंदिन कार्यात अडथळा निर्माण होत आहे. तर विद्युत केंद्रावर तक्रार केली असता, लाईन मन दुसऱ्या भागात आहेत, तिकडचे काम झाल्यावर तुमच्या भागात पाठवितो, असे सांगण्यात येते, याचाच अर्थ असा की पुरेसा कर्मचारी वर्ग महावितरण किंवा संबंधित कंत्राटदार ठेवत नाहीत. प्रत्येक विद्युत केंद्रावर फार अल्प कर्मचारी असल्यामुळे ग्राहकांच्या तक्रारीची दखल महावितरण घेऊ शकत नाही, हि वस्तुस्थिती आहे. यामध्ये महावितरणने संबंधित केंद्रावर ग्राहकांच्या संख्येच्या प्रमाणात पुरेसा कर्मचारी वर्ग दिला पाहिजे. अशी मागणीही किशोर बोरकर यांनी केली

यावेळी डॉ. बी. आर. देशमुख, रामेश्वर अभ्यंकर, डॉ श्रीकांत देशमुख, प्रा. डॉ. सुजाता झाडे, भैय्या साहेब निचळ, प्रा. अनिल देशमुख, राजाभाऊ चौधरी, अमरावती जिल्हा काँग्रेस औद्योगिक काँग्रेसचे अध्यक्ष समीर जवंजाळ, अमरावती तालुका शहर युवक काँग्रेसचे अध्यक्ष वैभव देशमुख प्रामुख्याने उपस्थित होते.

# शिरजगाव रोडवर कुजलेल्या महिलेच्या मृतदेहाचा उलगडा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११शिरजगाव कसबा**

ब्राम्हणवाडा ते शिरजगाव रस्त्यालगतच्या नाल्यात अज्ञात महिलेचा कुजलेला मृतदेह आढळल्यानंतर काही तासांतच गुन्ह्याचा छडा लावत स्थानिक ग्रामीण गुन्हे शाखेच्या पथकाने अचलपूर औरंगपुर येथील गळंकी येथील अनिल जांभेकर (३५) याला अटक केली.मृतदेहाची ओळख दुर्गा विशाल श्रोती (२७, रा. गळंकी) अशी पटली. तिच्या हातावर दुर्गा व अनिल अशी गोंदवलेली नावे आढळली. दुर्गाचे अनिलसोबत प्रेमसंबंध होते. पैशाच्या कारणावरून ५ जुलै रोजी झालेल्या भांडणात अनिलने तिचा गळा दाबून खून केला व मृतदेह ब्लँकेटमध्ये गुंडाळून मोटरसायकलवरून शिरजगाव रोडवरील नाल्यात फेकून दिला, अशी कबुली त्याने दिली. या प्रकरणी शिरजगाव कसबा पोलीस ठाण्यात कलम १०३(१), २३८(ब) अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# आता सहकारी संस्थांनाही मिळणार पुरस्कार १८ जुलैपर्यंत प्रस्ताव सादर करता येणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

राज्यातील सहकार चळवळीला चालना देण्याच्या उद्देशाने सहकार चळवळीमध्ये उत्कृष्ट योगदान देणाऱ्या सहकारी संस्थांना शासनामार्फत सहकार पुरस्कार देऊन गौरविले आणार आहे. यामुळे सहकार चळवळीत दखलपात्र कार्य करणाऱ्या संस्था त्यांच्या पदाधिकाऱ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप पडणार आहे.

सहकार महर्षी, सहकार भूषण व सहकारनिष्ठ या नावाने सहकारी संस्थांना शासनाकडून पुरस्कार दिले जाणार आहे. राज्यातील कामकाजात सर्वोत्कृष्ट ठरणाऱ्या एका सहकारी संस्थेला 'सहकार महर्षी' हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. एक लाख रुपये रोख, स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. 'सहकार भूषण' हा पुरस्कार २१ संस्थांना दिला जाणार आहे. हा पुरस्कार राज्यातील प्रत्येक विभागातून प्रत्येकी एक याप्रमाणे सहकारी संस्थांना प्रदान करण्यात येणार आहे. तसेच एक पुरस्कार राज्यस्तरीय सहकारी संस्थेला प्रदान केला जाणार आहे. या पुरस्कारचे स्वरूप ५१ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह व प्रश्स्तीपत्र दिले जाणार आहे. 'सहकार निष्ठ' हा पुरस्कार उत्कृष्ट कार्य करणाऱ्या एकुण २३ संस्थांना दिला जाणार आहे. हा पुरस्कार राज्यातील प्रत्येक विभागातून प्रत्येकी दोन याप्रमाणे ९ विभागातून त्यांनी केलेल्या उत्कृष्ट कार्यासाठी निवडलेल्या एकूण १८ संस्थांना दिला जाणार आहे. तसेच इतर पुरस्कार राज्यस्तरीय संस्थांना देण्यात येणार आहे. या पुरस्काराचे स्वरूप २५ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्र असे राहणार आहे. सहकारी संस्थांनी आपले पुरस्कारासाठी प्रस्ताव ज्या तालुक्यात त्यांचे मुख्यालय आहे, त्या तालुक्याचे तालुका सहाय्यक निबंधक अथवा उपनिबंधक यांचेकडे सादर करायचा आहे. सन २०२३-२४ या आधारावर सहकार पुरस्कारासाठी आर्थिक वर्षामधील कामगिरीच्या संस्थांची निवड केली जाणारआहे.

# नक्षत्र वाहनावरून लावला जातो पावसाचा अंदाज प्रगत युगातही ग्रामीण भागात प्रचलित परंपरा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

जून सुरू झाला, की शेतकरी आकाशाकडे डोळे लावून बसतात. ग्रामीण भागात पावसाला नातेसंबंधात गुंफणारी अनेक नावे आहेत. या नावाप्रमाणेच नक्षत्रात येणाऱ्या विविध वाहनांवरून आजही पावसाचा अंदाज बांधला जातो. एका बाजूला हवामान खाते अत्याधुनिक तंत्राने प्रगत होत असतानाही नक्षत्र आणि वाहनानुसार पावसाचा अंदाज बांधण्याच्या पारंपरिक पद्धतीचा



अवलंब आजही ग्रामीण भागात होताना दिसतो.पावसाळ्यात येणारे अतिवृष्टी, लाटांची उंची याचा अंदाज हवामान विभागाकडून नेहमीच वर्तविला जातो. या अंदाजानुसार कधी मुसळधार, कधी मध्यम, तर कधी कमी स्वरूपाचा पाऊस पडण्याचे तर्क-वितर्क लावले जातात. हवामान खाते अस्तित्वात नव्हते, तेव्हापासून पूर्वापार, ऐतिहासिक काळापासून शेतकरी वर्ग नक्षत्र आणि त्यांची वाहने यावर पडणाऱ्या पावसाचा अंदाज लावायचे. आजही ग्रामीण भागामध्ये पावसाची वाहने व पावसाची विविध नावे हा एक अनोखा, गमतीचा व संशोधनाचाही विषय आहे. ग्रामीण भागात शेतकरीवर्गात पावसाची नावे ठेवतानाही त्याला विविध नातेसंबंधाची जोड दिली आहे.

**असा काढला जातो अंदाज**

पावसाचा अंदाज घेताना त्या नक्षत्रासाठी असलेल्या वाहनाला फार महत्त्व आहे. वाहनावरून पावसाचा अंदाज शेतकऱ्याला येतो. प्रत्येक वर्षी अंदाजानुसार वाहन बदलत असते, हे विशेष. हत्ती, बेडूक आणि म्हैस ही वाहने असल्यास भरपूर पाऊस पडतो. उंदीर, गाढव, मेंढा हे वाहन असल्यास कमी पाऊस अपेक्षित आहे, तर मोर, कोल्हा, घोडा हे वाहन असल्यास मध्यम पाऊस पडेल, असा अंदाज असतो.

# शेतकऱ्याने उभारलेल्या सौर पंपाचे वादळी वाऱ्याने झाले नुकसान

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११दर्यापूर**

तालुक्यातील भुरस रामागड येथील येथील शेतकऱ्याने पोटाला चिमटा घेऊन आपल्या शेतात सौर ऊर्जा पंप उभारले मात्रनैसर्गिक आपत्ती कधी काय घटना घडवून आणेल, हे काही सांगता येन शक्य नाही. अशीच एक घटना २४ जून रोजी दर्यापूर तालुक्यात समोर आली आहे. भुरस रामागड येथील शेतकरी यांचे शेत शेतशिवारात असून वादळी वाऱ्यामुळे गट क्र. ४२ मधील रमा बोद्राजी प्रभे या शेतकरी महीलेच्या शेतातील शेत विहीरीजवळ सौर कृषी पंपाचे नुकसान खूप मोठ्या प्रमाणात झाले आहे. पावसाळा सुरु झाला असून, कपाशी लागवड जोमात सुरू असताना मध्येच ही अडचण निर्माण झाल्याने सध्या अनेक अडचणी निर्माण झाल्या आहे. शेतकरी महीला रमा प्रभे यांच्या शेतात शेत विहीरी जवळ कसुम सोलर पंप योजने अंतर्गत सौर कृषी पंप बसवण्यात आला आहे. भुरस रामागड



परिसरात दि. २४ जून २०२५ ला दुपारी २ वाजेच्या सुमारे अचानक आलेल्या वादळी वाऱ्यामुळे त्यांच्या शेतातील सौर पंपावरील पॅनल पूर्णतः उडून गेले आहेत. यामुळे शतकरी महीला रमा प्रभे यांचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याच्या कारणास्तव सदर शेतकरी सध्या प्रचंड चिंतेत असून शासनाकडून नुकसान भरपाईची मागणी होत आहे.